रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८८ ▌अंक ७ ▌पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

रायगड, गुरुवार, दि. १३ जून २०२४

# कृषीवल

किंमत ४ ₹

## इटलीत महात्मा गांधींच्या पुतळ्याची विटंबना

**रोम :** इटलीमध्ये महात्मा गांधींच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण केल्यानंतर खलिस्तानी कट्टरपंथीयांकडून पुतळ्याची विटंबना करण्यात आली आहे. तसेच पुतळ्याच्या भिंतीवर खलिस्तानी अतिरेकी हरदीप सिंह निज्जर याच्याबद्दल वादग्रस्त मजकूरही लिहिण्यात आला आहे. या घटनेनंतर स्थानिक प्रशासनाने तात्काळ सदर परिसर स्वच्छ करून घेतला असल्याची माहिती मिळत आहे. क्वात्रा म्हणाले की, भारतीय यंत्रणेने या घटनेची माहिती इटलीच्या यंत्रणेला दिली आहे. तसेच योग्य ती कारवाई करण्यासही सांगितले आहे.



# जिल्हा रुग्णालय, शिवतीर्थ अतिधोकादायक



। रायगड । प्रतिनिधी ।

**अलिबाग नगरपालिकेकडून अलिबाग शहरातील एकूण ३१ धोकादायक व अतिधोकादायक इमारतींची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या यादीमध्ये अलिबागचे जिल्हा सामान्य रूग्णालय व रायगड जिल्हा परिषदेची शिवतीर्थ इमारत या दोन शासकीय इमारतींचा 'अतिधोकादायक' म्हणून समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे या धोकादायक इमारतींमधून शासनाने जनतेला त्वरीत सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करण्याची तसेच या इमारतींबाहेर ती इमारत अतिधोकादायक असल्याचे फलक लावण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी केली आहे.**

### शहरातील ३१ इमारतींचाही समावेश; अलिबाग नगरपालिकेने केले जाहीर



अलिबागचे मुख्य जिल्हा रूग्णालय इमारतीमध्ये शेकडो रूग्ण उपचार घेत असून, त्यांच्याबरोबर असणारे नातवाईक, त्यांच्यावर उपचार करणारे डॉक्टर्स, नर्सेस, वॉर्डबॉय यांचा वावर असतो. तसेच रा.जि.प. शिवतीर्थ इमारत रिकामी केली असली तरी या इमारतीमध्ये राजिपचे जुने रेकॉर्ड असल्याने या इमारतीमध्येही कर्मचारी ये-जा करीत असतात. त्यामुळे येत्या पावसाळ्यात जर या इमारतींना काही धोका उद्‌भवल्यास शेकडो लोकांचे हकनाक बळी जाण्याची भीती सावंत यांनी व्यक्त केली आहे.

1. कोट्यवधींचा निधी जाणार पाण्यात
2. कर्मचाऱ्यांवर भितीची टांगती तलवार
3. प्रशासनाकडून फलक लावण्याची मागणी
4. संजय सावंत यांचे प्रशासनाला निवेदन

या विषयाचे निवेदन त्यांनी रायगडचे जिल्हाधिकारी, रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड पोलीस अधिक्षक, जिल्हा सामान्य रूग्णालयाचे जिल्हा शल्यचिकित्सक, सार्वजनिक बांधकाम, विभागाचे कार्यकारी अभियंता, अलिबाग नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी यांना ईमेलव्दारे पाठविले आहे.

जिल्हा सामान्य रूग्णालयाची इमारत अतिधोकादायक आहे. असे जाहीर करतानाच कार्यकारी अभियंता यांच्या मार्फत या इमारतीवर रॅम्प बांधणे व इतर दुरूस्तीची काम सुरू असून हा कोट्यवधींचा निधी ही इमारत पडल्यास वाया जाणार असल्याने सदरचे काम त्वरीत थांबविण्यात यावीत, पान २ वर

**उरण -पिरकोन येथील घटना**

# तळ्यात बुडून मायलेकाचा मृत्यू





- उरण पोलीस ठाण्यात आसस्मिक मृत्यूची नोंद
- हृदयद्रावक घटनेने उरण तालुका हळहळला

। उरण । वार्ताहर ।

तळ्यात बुडणाऱ्या सात वर्षांच्या मुलाला वाचविण्याच्या प्रयत्नात आई आणि मुलाचा बूडून मृत्यू झाल्याची घटना उरण तालुक्यातील पिरकोन गावात घडली. या हृदयद्रावक घटनेने उरण तालुका हळहळला आहे.

उरण तालुक्यातील पिरकोन गावात निरा पाटील व त्यांचा मुलगा रिहान पाटील गावातील तळ्यात संध्याकाळी कपडे धुण्यासाठी गेले होते. आई कपडे धुण्याच्या कामात व्यस्त असताना अचानक रिहानचा पाय पायरीवरून घसरला आणि तो तळ्यात पडला. चिमुकला रिहान गटांगळ्या खाऊ लागला. रिहानला बुडताना पाहून त्याला वाचविण्यासाठी आईने थेट तळ्यात उडी घेतली. मात्र मुलाला वाचविण्याच्या प्रयत्नात दोघांचाही बुडून मृत्यू झाला.

तळ्यात कपडे धुण्यासाठी गेलेले माय-लेक संध्याकाळी साडेसात वाजले तरी घरी परत आले नाहीत. यामुळे काळजीत पडलेल्या नीराचे सासरे तळ्याकाठी पाहण्यासाठी आले. त्यांना तळ्याकाठी धुण्यासाठी आणलेले कपडे व चपला दिसल्या. मात्र सून निरा व नातू रिहान दिसले नाहीत. त्यामुळे त्यांनी आजूबाजूला शोध घेतला.

ते दोघे तळ्यात तर बुडाले नसतील ना? अशी शंका त्यांच्या मनात आली. त्यामुळे त्यांनी आरडाओरडा सुरू केला. त्यांचा आरडा-ओरडा ऐकून ग्रामस्थ तळ्याकाठी जमले. त्यांनी तळ्यात शोध घेतला असता आई व मुलगा बुडालेल्या अवस्थेतही एकमेकांच्या हातात हात घालून मृत्युमुखी पडल्याचे हृदयद्रावक दृश्य पाहायला मिळाले.

दोघांच्याही नाकातोंडात पाणी जाऊन त्यांचा मृत्यू झाला होता. याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असल्याची माहिती उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी दिली.

**आजचा अग्रलेख**

**विधानसभेच्या दिशेने**

**वे|ध|क**

### चंद्राबाबूंनी घेतली मुख्यमंत्रीपदाची शपथ

**आंध्र प्रदेश :** तेलुगु देसम पार्टी (टीडीपी) प्रमुख एन चंद्राबाबू नायडू यांनी बुधवारी (दि.१२) चौथ्यांदा आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. चंद्राबाबू नायडू यांच्यानंतर जनसेना प्रमुख आणि अभिनेता पवन कल्याण यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. चंद्राबाबू नायडू यांच्या सरकारमध्ये उपमुख्यमंत्र्यांसह २३ मंत्री आहेत. टीडीपीचे १९, पवन कल्याणसह जनसेनेचे ३ आणि भाजपचा एक मंत्री आहे. एक पद रिक्त ठेवण्यात आले आहे.

## पेणमध्ये डेंग्यू?



- आरोग्य यंत्रणेचा निष्काळजीपणा
- नागरिकांमध्ये चर्चांना उधाण

। खरोशी । वार्ताहर ।

आठवडाभरापासून पावसाला सुरुवात झाली असली तरी पेणसह अनेक गावांमध्ये विविध आजारांची साथ जोरात सुरू असल्याचे दिसून येत आहे. जिते प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत जिते आणि रावे या दोन गावांमध्ये डेंग्यू सदृश्य रुग्ण दिवसेंदिवस वाढत असल्याचे चिन्ह दिसून येत आहे. जिते गावातील १७ रुग्णांना डेंग्यूची लागण झाल्याचा अहवाल आला असतानादेखील प्राथमिक आरोग्य केंद्राचे कर्मचारी आणि डॉक्टर यांच्या म्हणण्यानुसार जिते येथे डेंग्यूचा एकही रुग्ण सापडला नसल्याची माहिती येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिली आहे. असे असले तरी गावात डेंग्यूची साथ पसरली असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

पेणमधील एका प्रयोगशाळेमध्ये रुग्णांची तपासणी केली असता एकट्या जिते गावामध्ये सुमारे १७ रूग्ण डेंग्यू पॉझिटिव्ह असल्याचे रिपोर्ट मिळालेले आहेत.


गावातील सुमारे पंधरा जणांचे रिपोर्ट निगेटिव्ह आल्याचेही दिसून येत आहे. याबाबत जिते प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना विचारले असता जिते गावांमध्ये डेंग्यूचा एकही रुग्ण नाही, गाव स्थिर आहे. अशा प्रकारची माहिती देऊन अधिकाऱ्यांनी आपली पान २ वर

# डोंबिवली हादरली!

## इंडो अमाईन्स केमिकल कंपनीला आग

। डोंबिवली । प्रतिनिधी ।

डोंबिवली एमआयडीसीमधील इंडो अमाईन्स या केमिकल कंपनीत आग लागल्याची घटना घडली आहे. यावेळी अनेक स्फोटांचे आवाजही येत होते. अग्निशमन दलाच्या पाच ते सहा गाड्या घटनास्थळी रवाना झाल्या आहेत. आग लागण्याचं नेमकं कारण अद्याप समोर आलेलं नाही. या आगीचे लोळ पाहून परिसरात राहणाऱ्या रहिवाशांमध्ये भितीचं वातावरण निर्माण झालं आहे.



या घटनेनंतर बाजूला असणाऱ्या अभिनव शाळेतील विद्यार्थ्यांना घरी पाठवण्यात आलं आहे. आजूबाजूच्या परिसरातील कारखान्यातील कामगारांना बाहेर काढण्याचे प्रयत्न करण्यात येत आहे. आग लागलेल्या कंपनीच्या परिसरात अनेक विविध कारखाने आहेत. त्यामुळे लवकरात लवकर आगीवर नियंत्रण मिळवण्याची गरज आहे. सदर घटनेनंतर परिसरातील विद्युत पुरवठा बंद करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसांमध्ये डोंबिवलीतील एमआयडीमध्ये आगीच्या अनेक घटना घडत आहे. मात्र यानंतरही राज्य सरकारने धडा घेतला नाही का?, अशा सवालही नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

१५ दिवसांपूर्वीच एमआयडीसीमध्ये एक मोठा स्फोट झाला होता. यामध्ये १७ जणांचा मृत्यू झाला होता. त्यामुळे पुन्हा आग लागल्याने नागरिकांमध्ये घबराट पसल्याचे दिसून येत आहे.

# कुवैतमध्ये आग; ४१ मृत्यू

। कुवैत । वृत्तसंस्था ।

मंगाफ शहरात बुधवारी (दि.१२) सकाळी वसाहत इमारतीला आग लागण्याची मोठी दुर्घटना घडली. या आगीत ४१ जणांचा बळी गेला असून ४० जण गंभीर जखमी झाले. मृतांमध्ये १० भारतीय नागरिकांचा समावेश होता.

पोलिसांनी या घटनेची माहिती देताना सांगितलं की, बुधवारी सकाळी दक्षिण कुवैतमधील मंगाफ शहरातील एका इमारतीत आग लागली. या इमारतीत भारतासह आशियातून आलेल्या मजुरांचे वास्तव्य आहे.

मेजर जनरल रशीद हमद म्हणाले, स्थानिक वेळेनुसार सकाळी सहा वाजता आम्हाला या आगीच्या घटनेची माहिती मिळाली. आम्ही त्वरित ही माहिती अग्निशमन दलासह संबंधित अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर बचावकार्य हाती घेण्यात आलं. या घटनेबाबत मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार एका घरातील स्वयंपाकघरात आग लागली आणि ती आग काही मिनिटात संपूर्ण इमारतीत पसरली.

इमारतीतल्या ज्या घरात आग लागली त्या घरात केरळमधील एक व्यक्ती वास्तव्यास होती. या इमारतीत राहणारे बहुसंख्य लोक दक्षिण भारतीय नागरिक आहेत. तसेच या आगीत मृत्यू झालेल्या १० भारतीयांपैकी पाच जण मूळचे केरळचे रहिवासी होते. या दुर्घटनेची माहिती मिळताच कुवैतचे उपपंतप्रधान फहद युसुफ अल सबा यांनी घटनास्थळी भेट दिली आणि परिस्थितीचा आढावा घेतला.

# माथेरानमध्ये घोडे बंद आंदोलन

- ई-रिक्षा विरोधात अश्वपालक आक्रमक
- कारवाई करा अन्यथा आंदोलन कायम राहणार



। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरात पर्यावरणपूरक ई-रिक्षा श्रमिक हातरिक्षा चालक यांना चालविण्यास देण्यात आल्या आहेत. या ई-रिक्षा चालविताना सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेले नियम मोडण्यात आले. त्यामुळे त्या विरोधात नगरपरिषद प्रशासनाने कारवाई करावी या मागणीसाठी माथेरानमधील घोडे बुधवार (दि.१२) बंद ठेवण्यात आले.

दरम्यान, पालिकेने कारवाई करण्याचे लेखी आश्वासन दिले नाही तर यापुढे देखील घोडे रस्त्यावर येणार नाहीत असा निर्धार माथेरानमधील अश्वपालकांनी केला आहे. तर घोडे रस्त्यावर आले नसल्याने पर्यटकांना पॉईंटवर जाण्यासाठी घोडे उपलब्ध झाले नसल्याने पर्यटकांची गैरसोय झाली.

माथेरानमध्ये हातरिक्षा चालक यांच्यासाठी ऐतिहासिक निर्णय झाला. शहरात पर्यटकांची ने-आण करण्यासाठी ९४ हातरिक्षा चालविल्या जातात. त्यातील २० हातरिक्षा चालकांना पहिल्या टप्प्यात ई-रिक्षा चालविण्याची संधी मिळाली आहे. त्या हातरिक्षा चालकांनी खरेदी केलेल्या आणि सर्व वाहतूक परवाना मिळालेल्या ई-रिक्षांचे लोकार्पण करण्यात आले. त्या सर्व ई-रिक्षा ११ जून रोजी माथेरान शहरात प्रवाशांच्या सेवेत आल्या. त्या रिक्षाबाबत माथेरानमधील स्थानिक अश्वपाल संघटना तसेच मुळवासी अश्वपाल संघटना यांनी आज १२ जून रोजी आंदोलन पुकारले. पान २ वर

### कोकण पदवीधरसाठी ठाकरे गटाचा

# काँग्रेसला पाठिंबा

। रायगड । प्रतिनिधी ।

लोकसभा निवडणुकीचा रणसंग्राम शांत होत नाही तोच महाराष्ट्र विधानपरिषदेच्या कोकण पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीचे रण तापण्यास सुरुवात झाली आहे. कोकण पदवीधर आणि नाशिक शिक्षक मतदारसंघात मविआमधील ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये आता समेट झाले आहे. कोकण पदवीधरमधून ठाकरे गटाच्या किशोर जैन यांनी माघार घेतली आहे. तर नाशिकमध्ये काँग्रेसच्या दिलीप पाटील यांनी माघार घेतली आहे. त्यामुळे आता कोकणातील जागेवर ठाकरे गटानं उमेदवार मागे घेतल्यानंतर भाजपचे निरंजन डावखरे विरुद्ध काँग्रेसचे रमेश कीर यांचा सामना होणार आहे.

उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून कोकण पदवीधर मतदार संघाच्या निवडणुकीसाठी किशोर जैन यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली होती. त्यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल देखील केला होता. मात्र नाशिक शिक्षक मतदार संघाच्या निवडणुकीत काँग्रेसने ठाकरे गटाला जागा सोडल्याने कोकण पदवीधरची जागा ठाकरे गटाला सोडावी लागली. यामुळे किशोर जैन यांना आपला उमेदवारी अर्ज मागे घ्यावा लागला आहे. कोकण पदवीधरसाठी किशोर जैन यांनी आपली तयारी सुरु केली होती. पदवीधर मतदारांपर्यंत किशोर जैन यांची यंत्रणा पोहचली होती. पान २ वर

# दरडग्रस्तांना घरकुलाची प्रतीक्षा



शैलेश पालकर

। पोलादपूर ।

### कोंढवी कोतवाल, साखर सुतारवाडी अन् केवनाळे गावांचा समावेश

राजकीय हेतूने सुरू झालेले पोलादपूर तालुक्यातील दरडग्रस्तांच्या पुनर्वसन कार्याचे रखडणे हा प्रघात २००५ नंतर २०२१ च्या नैसर्गिक आपत्तीदरम्यानही पुन्हा घडल्याचे दिसून येत आहे. साखर सुतारवाडीतील दरडग्रस्तांना मोबदला देऊन प्रतिक्षेत ठेवण्याचा प्रकार सरकारकडून झाल्यानंतर केवनाळे येथे दरडग्रस्तांना घरकुलांच्या प्रतिक्षेत ठेऊन बाकीची संरचनात्मक कामे पूर्णत्वास गेल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

शासनाकडून भूसंपादन आणि नागरी सुविधांसाठी निधी वितरित केला असून २४ जुलै २०२३ रोजी शासन निर्णय क्रमांक: दग्रपु ३१२३-४१-प्रक्र -३२-र-५ अन्वये कायमस्वरूपी पुनर्वसनाच्या प्रस्तावास मान्यता देताना शासनाने ३ कोटी ९५ लाख ६० हजार रूपयांचा निधी मंजूर केल्याचे परिपत्रक जारी केले आहे. या परिपत्रकानुसार देवळे ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील केवनाळे येथे पुनर्वसनासाठी १२८ घरांची संख्या निश्चित करून प्रत्येकी २ लाख ३० हजार रूपयांप्रमाणे २ कोटी ९४ लाख ४० पान २ वर

**एकदा तरी जावे पंढरी, भेटाया त्या सावळ्या हरु...**

# भाविकांच्या सेवेसाठी लालपरी सज्ज

। रायगड । प्रतिनिधी ।

**आषाढी यात्रेनिमित्त विठू नामाचा जयघोष करीत श्री श्रेत्र पंढरपुरला जाणाऱ्या भाविक प्रवाशांसाठी एसटीने यात्राकाळात ५ हजार विशेष बस सोडण्याचे नियोजन केले आहे. विशेष म्हणजे यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्यापेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगारात संपर्क साधावा, असे आवाहन एसटी महामंडळातर्फे करण्यात आले आहे.**

### फुकट्या प्रवाशांना लगाम

यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकिट न काढणे, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे अशाप्रकारे फुकट प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्याचे नियोजन केले आहे. फुकट्या प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवून असणार आहेत.





### वाहतूकीच्या नियोजनासाठी एसटीची मदत

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक प्रवासी आपल्या गावाकडे मार्गस्थ होतात. अशावेळी रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊन प्रवासाचा खोळंबा होतो. यंदा स्थानिक पोलीस प्रशासनाच्या खांद्याला खांदा लावून ३६ पेक्षा जास्त वाहतूक नियंत्रक व सुरक्षा रक्षक वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी काम करणार आहेत.

### 5 हजार विशेष बसेस सोडणार

सालाबादप्रमाणे श्री श्रेत्र पंढरपुर येथे आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक-प्रवासी येतात. अनेक प्रवासी स्वत:च्या खासगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा विविध पालखींबरोबर चालत दिंडीने येतात. या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बससेवा उपलब्ध करून दिली आहे. ४० पेक्षा जास्त भाविक प्रवाशांची संख्या असल्यास त्यांना त्यांच्या

### ग्रुप बुकींग असल्यास गावातून थेट पंढरपूर

गावापासून विशेष बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. अर्थात या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकीट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत. मागील वर्षी एसटीने आषाढी यात्रेनिमित्त ४२४५ विशेष बसेस सोडल्या होत्या. पान २ वर

# भाजपाने किंमत करून घेतली

### स्वयंसेवक संघाच्या मुखपत्रातून टीका

। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

राष्ट्रीय स्वंयसेवक संघावर अनेक पुस्तके लिहिलेल्या रतन शारदा यांनी लोकसभा निवडणुकीत भाजपाच्या पराभवाला नको असलेले राजकारण कारणीभूत असल्याचे म्हटले. यासाठी त्यांनी महाराष्ट्राचे उदाहरण दिले. महाराष्ट्रात काही गोष्टी टाळता आल्या असत्या. जसे की, भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाचे बहुमत असतानाही राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला बरोबर घेतले गेले. यामुळे कित्येक वर्ष काँग्रेसी विचारधारेच्या विरोधात लढत असलेल्या भाजपाच्या समर्थकांना धक्का बसला. या एका कारणामुळे भाजपाने आपली किंमत कमी करून घेतली, अशी टीका रतन शारदा यांनी केली.

लोकसभा निवडणुकीत बहुमत गाठण्यापासून ३२ जागा दूर राहिलेल्या भाजपाला राष्ट्रीय स्वंयसेवक संघाच्या मुखपत्रातून सुनावण्यात आले आहे. ऑर्गनायझर साप्ताहिकात संघाचे आजीव सदस्य रतन शारदा यांनी भाजपाच्या डोळ्यात अंजण घालणारा लेख लिहिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या करिष्म्यामुळे हवेत गेलेल्या भाजपा कार्यकर्ते आणि नेत्यांसाठी लोकसभा निवडणुकीचा निकाल त्यांना वास्तवाची जाण पान २ वर

# माणगावतर्फे वरेडी पाणी योजना कुर्मगतीने

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुक्यातील माणगाव तर्फे वरेडी नळपाणी योजनेचे काम गेली वर्षभर संथगतीने सुरु आहे. या नळपाणी योजनेचे जलकुंभ कामाची चौकशी गेली तीन महिने सुरू आहे. मात्र ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून योजनेचे काम वेळेत पूर्ण व्हावे यासाठी कोणत्याही प्रकारचा पुढाकार घेण्यात येत नाही.**





माणगाव ग्रामपंचायतीमधील माणगाव तर्फे वरेडी नळपाणी योजनेचे काम २०२२ रोजी मंजूर करण्यात आले आहे. कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावरील पुलाच्या बाजूला उद्भव विहीर बांधून नळपाणी योजना राबविण्यात येत आहे. जलजीवन मिशनमधून या नळपाणी योजनेसाठी १९ लाख रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला आहे. त्यात नदीवर उद्भव विहीर आणि माणगावमध्ये जलकुंभ तसेच पाणी वितरण करण्यासाठी जलवाहिन्या टाकण्यात येणार होत्या. या योजनेच्या उद्भव विहिरीचे काम गेल्या अनेक महिने अर्धवट अवस्थेत आहे. त्याचवेळी पाणी वितरण करणाऱ्या जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत. त्या जोडण्यात आल्या नाहीत. नदीवरील पंप हाऊसचे काम अनेक महिने अपूर्ण अवस्थेत आहे. या योजनेचे काम करणाऱ्या ठेकेदाराकडून नळपाणी योजनेकडे दुर्लक्ष होत आहे काय? असा प्रश्न ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.

या नळपाणी योजनेचा पाणी साठवण टाकी जलकुंभाचे काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. अशी तक्रार बेकरे गावातील ग्रामस्थ आकाश कराळे यांनी केली असून जलकुंभ साठवण टाकीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी केली होती. त्यानुसार कर्जत ग्रामीण पाणीपुरवठा विभागाकडून चौकशी सुरू करण्यात आली होती. त्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी लागला असून त्यामुळे नळपाणी योजनेचे काम बंद आहे.

या नळपाणी योजनेमधून गेल्या दीड वर्षात हर घर जल ही संकल्पना यशस्वी झाली नाही. याबाबत चुकीच्या पद्धतीने केलेल्या कामाबद्दल स्थानिक ग्रामस्थांनी घेतलेल्या आक्षेपांवर ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणा यांनी कोणतेही कार्यवाही केलेली नाही असे दिसून आले आहे.

> ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर आम्ही पाणी साठवण टाकीचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची मागणी मान्य केली होती. वरिष्ठ अभियंते यांनी त्या कामाचे पाहणी आणि चौकशी पूर्ण केली असून चौकशी अधिकारी यांच्या अहवालाची वाट पाहत आहोत.
> – सुजित धनगर, सहायक अभियंता लघु पाटबंधारे विभाग रायगड जिल्हा परिषद

> माणगाव तर्फे वरेडी नळपाणी योजनेचे काम सुरू असून कोणती कामे पूर्ण झाली याची माहिती घेवून देतो.
> – अनिल मेटकरी, उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग

# स्वच्छता अभियानात हिरवळ महाविद्यालयाचा सहभाग

**। माणगाव । वार्ताहर ।**



छत्रपती शिवाजी महाराजांचा शिवराज्याभिषेक सोहळा ६ जून रोजी रायगड किल्ल्यावर साजरा करण्यात आला. यानिमित्ताने मुंबई विद्यापीठाचे प्र.कुलगुरू, डॉ. अजय भामरे यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली रायगड स्वच्छता अभियान सुरळीत पार पडले. या स्वच्छता अभियानात महाड हिरवळ महाविद्यालयाने सहभाग घेतला.

सदर स्वच्छता मोहिमेत डॉ.सुनील पाटील, प्रा.सुशिल शिंदे, डॉ.टी.पी.मोकल यांनी अतिशय उत्कृष्ट प्रकारे एनएसएस विद्यार्थ्यांचे नियोजन केले होते. सदर मोहिमेत मुंबई विद्यापीठांतर्गत २० महाविद्यालयांनी सुमारे ४५० विद्यार्थ्यांसह किल्ले रायगडची स्वच्छता मोहीम पार पाडली. हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्समधील प्राचार्य सुदेश कदम यांच्या प्रोत्साहनाने एनएसएस समन्वयक प्रा. राकेश वडवलकर शिक्षक वर्ग आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांनी मोलाचा सहभाग नोंदवला. स्वच्छता अभियानाच्या शेवटी मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीच्या पथकाने छत्रपती शिवराय, माँ साहेब जिजाऊ, तानाजी मालुसरे यांच्या शौर्यगाथा संगीतमयरित्या सादर केल्या. संपूर्ण अभियान यशस्वी केल्याबद्दल प्र.कुलगुरू डॉ.भामरे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. या उपक्रमाचे महत्त्व लक्षात घेऊन, हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया यांनी तरुणांमध्ये नागरी जबाबदारीची भावना वाढवण्यासाठी अशा प्रयत्नांच्या महत्त्वावर भर देताना सदर स्वच्छता मोहिमेचे आयोजक, नियोजक आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांचे कौतुक करून पुढील समाज कार्यास शुभेच्छा दिल्या. समाजाने स्वच्छता राखावी असे आवाहन केले.

पान १ वरून

## जिल्हा रूग्णालय, शिवतीर्थ ‘अतिधोकादायक’

अशी मागणीही सावंत यांनी केली आहे.

अलिबाग नगरपालिकेने महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरे अधिनियम १९६५ चे कलम १९५ नुसार, अलिबाग शहरांतील नमूद मालमत्ता धारकांस आवाहन करण्यात आले की, आपली इमारत किंवा इतर संरचना किंवा अशा इमारतीवर किंवा संरचनेवर बसविलेली कोणतीही वास्तू भग्नावस्थेत असेल किंवा पडण्याचा संभव असेल अशा अतिधोकादायक वास्तू, इमारत किंवा संरचना या नगदपरिषदेकडून देण्यात आलेल्या निर्देशानुसार स्वस्तरावर निष्कासित करण्यात याव्यात. तसेच नगरपरिषदेने बजावलेल्या नोटीशीनुसार धोकादायक वास्तू, इमारत किंवा संरचना यांची मान्यताप्राप्त स्ट्रक्चरल इंजिनियर यांच्याकडून स्ट्रक्चरल ऑडीट करुन घ्यावे. या ऑडीट अहवालानुसार वास्तू, इमारत किंवा संरचना यांची मजबूती, दुरुस्ती करुन घ्यावी, तसेच मजबूती, दुरुस्ती शक्य नसल्यास अशा प्रकारच्या भग्नावस्थेतील वास्तूत कोणीही वास्तव्य करु नये. सदर इमारतीमधील रहिवाशांनी इतरत्र सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत व्हावे. तथापी या उपरही कोणी वास्तव्यास राहिल्यास व त्यामुळे कोणतीही जीवित वा वित्तहानी झाल्यास त्यास नगरपरिषद जबाबदार राहणार नाही, याची नोंद घ्यावी असे जाहीर आवाहन प्रसिध्द केले आहे.

## पेणमध्ये डेंग्यू?

जबाबदारी झटकल्याचे दिसून येत आहे. शासनाने या डेंग्यू आजाराची तात्काळ दखल घेऊन डेंग्यूची साथ रोखावी अशी मागणी ग्रामस्द करीत आहेत. डेंग्यूचे रुग्ण हे पेण शहरातील खासगी दवाखान्यामध्ये उपचार घेत आहेत.

## माथेरानमध्ये घोडे बंद आंदोलन

त्यावेळी माथेरानमध्ये प्रवासी वाहतूक करणारे ४६४ घोडे रस्त्यावर आले नाहीत. सर्व अश्वपालकांनी घोडे रस्त्यावर न काढता सकाळी माथेरान नगरपरिषदेवर एकत्र जात पालिका मुख्याधिकारी आणि प्रशासक राहुल इंगळे यांना निवेदन दिले.स्थानिक अश्वपाल संघटनेच्या अध्यक्षा आशा कदम यांच्या नेतृत्वाखाली दोन्ही संघटनांचे अश्वपालक पालिकेत गेले होते.त्यावेळी स्थानिक अश्वपाल संघटना आणि मुळवासी अश्वपाल संघटना यांनी पालिकेला दिलेल्या निवेदनात अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. ११नोव्हेंबर रोजी सकाळी सहा वाजता ई-रिक्षा प्रवासी यांच्या सेवेत येणे आवश्यक असताना काही ई-रिक्षा घालून दिलेल्या वेळेचे नियम डावलून उशिरा दाखल झाल्या.२० ई-रिक्षा यांना परवानगी असल्याने आता ज्या सात रिक्षा पालिकेच्या आवारात आहेत. त्यांना शहराबाहेर पाठविण्यात यावे. न्यायालयाचा आदेशाने २० ई-रिक्षा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यातील काही रिक्षा वाहतूक नियम पाळत नाहीत. तसेच अनेक ईरिक्षांना नंबरदेखील नाहीत. अशा ई-रिक्षांवर विभागीय वाहतूक परिवहन अधिकारी यांनी कारवाई करावी. नवीन ई-रिक्षा चालकांकडून झालेल्या अपघाताची चौकशी करावी. शालेय विद्यार्थी आणि प्रवासी यांच्या सुरक्षिततेबाबत कोणती तरतूद आहे.११ जून रोजी काही ई-रिक्षा या मनाई हद्दीत गेल्या होत्या. रिगल नाका आणि उषा एस्कोट हॉटेल येथून काही ई-रिक्षा प्रवाशांना अधिक भाडे घेवून गेल्या आहेत. त्या सर्वांबद्दल अश्वपाल संघटनांनी पोलिसांना माहिती दिली आहे. त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी तसेच आगाऊ रक्कम घेवून प्रवासी वर्गाला सेवा दिली गेली काय? सेवा दिली असल्यास त्या ई-रिक्षांवर कारवाई करावी.अशा अनेक मागण्यांचे निवेदने स्थानिक अश्वपाल संघटना तसेच मुळवासी अश्वपाल संघटनांनी पालिकेला दिले आहे.या सर्व मागण्याबद्दल लेखी पत्र पालिकेकडून दिले जात नाही तोवर माथेरानमध्ये घोडे प्रवासी वाहतूक करणार नाहीत. लेखी पत्र मिळत नाही तोवर माथेरानमधील सर्व प्रवासी घोडे बंद ठेवले जाणार आहेत अशी माहिती अध्यक्ष आशा कदम यांनी दिली आहे.

## भाविकांच्या सेवेसाठी लालपरी सज्ज

या कालावधीत १८ लाख ३० हजार, ९३४ भाविक प्रवाशांची सुखरूप ने-आण एसटीने केली होती.चार तात्पूर्ती बस स्थानके उभारणार पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून गाड्या सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये, यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. रायगड जिल्ह्यातील भाविकांना चंद्रभागा बस स्थानकावरून प्रवास करता येणार आहे. दरम्यान, यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक अशा विविध सोयी-सुविधा पुरविण्यात येणार असून जास्तीत जास्त भाविक-प्रवाशांनी, एसटीच्या सुरक्षित सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन एसटी महामंडळ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## दरडग्रस्तांना घरकुलाची प्रतीक्षा

हजार रूपयांचा निधी तर साखर सुतारवाडी येथे पुनर्वसनासाठी ४४ घरांची संख्या निश्चित करून प्रत्येकी २ लाख ३० हजार रूपयांप्रमाणे १ कोटी ०१ लाख २० हजार रूपयांचा निधी असा एकूण १७२ घरांच्या पुनर्वसनाचा निधी मंजूर केला आहे. साखर सुतारवाडी येथे ६ तर केवनाळे येथे ५ जणांचे बळी दरडीखाली गेले. यापैकी केवनाळे गावाचा जिऑलॉजिकल सर्व्हे अहवाल वर्ग १ मध्ये आला आहे. या केवनाळे गावासाठी सद्यस्थितीमध्ये प्राथमिक शाळा, अंगणवाडी, बौध्दविहार, सभा मंडप आणि अंतर्गत रस्ते आदी कामे पुर्ण झाल्याची माहिती प्राप्त झाली आहे. केवनाळे गावातील दरडग्रस्तांसाठी पुनर्वसन संकुल अथवा घरकुलं देण्यासाठी बांधकामास सुरूवात झाली नसल्याचे याठिकाणी दिसून येत आहे.

२००५ साली झालेल्या कोतवाल आणि कोंढवी येथील दरडग्रस्तांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सरकारी आणि राजकीय अनास्थेमुळे अनुत्तरित राहिला आहे. कोतवाल खुर्द आणि बुद्रुकच्या दरडग्रस्तांसाठी २८ घरकुले उभी राहतील एवढे क्षेत्र उपलब्ध करण्यात येऊन पुनर्वसनाचे प्रयत्न सरकारकडून सुरू झाले. सिध्दीविनायक ट्रस्ट, मुंबईने याकामी खर्चाची जबाबदारी उचलली. कोतवालमध्ये दरडग्रस्तांची संख्या ४८ असताना येथे ४५ लाख रूपये खर्चातून केवळ १५ घरकुले उभारण्यात आली. कोतवाल खुर्द येथे १० डिसेंबर २००७ रोजी तांत्रिक मान्यता किंमत ४९ लाख २१ हजार ४३४ रूपये असून दरसूचीमध्ये झालेल्या वाढीमुळे निविदेची किंमत २३.५० टक्के अधिक वाढल्यामुळे १० लाख ६४ हजार ८१ रूपये खर्चातील अधिक वाढ होणार आहे. त्यानुसार कोतवाल खुर्द येथील एका घरकुलासाठी ३ लाख ४५ हजार ७९० रूपये ७५ पैसे खर्च झाल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून प्राप्त झाली आहे. या पुनर्वसन संकुलामध्ये कोणीही दरडग्रस्त वास्तव्यास नाही.

कोंढवी येथे ७८ कुटूंबे दरडग्रस्त असताना याठिकाणी प्रत्येकी ५० लाख रूपये खर्चातून केवळ १५ घरकुले उभारण्यात आली. कोंढवीमध्ये केवळ २९ पात्र दरडग्रस्त असल्याचे निश्चित करण्यात आले आहे. कोंढवी येथे तांत्रिक मान्यता किंमत ४९ लाख ४९ हजार ६५१ रूपये एवढी असून दरसूचीमध्ये झालेल्या वाढीमुळे निविदेची किंमत २३.५० टक्के अधिक वाढल्यामुळे कोंढवीतील एका घरकुलासाठी ३ लाख २० हजार ८७५ रूपये ९५ पैसे खर्च झाल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे म्हणणे आहे. सिध्दीविनायक ट्रस्टच्या माध्यमातून तब्बल १ कोटी रूपयांच्या निधीमधून बांधण्यात आलेली ही ३० घरकुले कोतवाल खुर्द व कोंढवी येथे बांधण्यात आल्यानंतर कोंढवी येथील घरकुलांच्या वाटपाची सोडत काढण्यासाठी २५ फेब्रुवारी २०११ रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेमध्ये वाटप झालेल्या १५ दरडग्रस्त लाभार्थ्यांपैकी गंगाराम काळू यादव उर्फ धोत्रे हाच एकमेव येथे वास्तव्यास आहे.

पोलादपूर तालुक्यातील २००५ साली झालेल्या दरडग्रस्तांच्या पुनर्वसनाच्या पहिल्या टप्प्यात बोरावळे येथील ९ घरांच्या बांधकामानंतर तेथील दरडग्रस्तांचे पुनर्वसन पूर्ण झाले. सावित्री महिला विकास संस्थेतर्फे पैठण गांवात ३, देवपूर येथे ४, पार्ले येथे ३, माटवण येथे ५, पोलादपूर- जोगेश्वरी गाडीतळ येथे ३, सडवली येथे ६, लोहारमाळ येथे ४, रानबाजिरे येथे २३, आड येथे २, सवाद येथे १ आणि हावरे येथे ६ अशी एकूण ६१ घरकुले बांधण्यात येऊन ताबाही देण्यात आला. पोलादपूर येथील चित्रे यांना घरबांधणीसाठी सरकारी अनुदान देण्यात आले. मात्र, मोठया प्रमाणात जीवित हानी झालेल्या कोतवाल आणि जमिनीला भेगा पडलेल्या कोंढवीतील पुनर्वसन रखडण्याच्या घटनेप्रमाणे २०२१च्या तब्बल ११ जीवितहानी झालेल्या दरडग्रस्त केवनाळे व साखर सुतारवाडीतील दरडग्रस्तांचे पुनर्वसन होण्यासाठी घरकुलं कधी बांधणार असा प्रश्न दरडग्रस्तांना पडलेला आहे.

## काँग्रेसला पाठिंबा

पक्षाने आदेश दिल्याने किशोर जैन यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊन काँग्रेसचे उमेदवार रमेश किर यांच्या सोबत राहण्याचा निर्णय घेतला आहे.दरम्यान , कोकण विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूकीसाठी स्वीकारण्यात आलेल्या एकूण २५ नामनिर्देशनपत्रांची छाननी झाल्यानंतर १२ अर्ज नामनिर्देशन मागे घेण्यात आले असून निवडणूकीच्या रिंगणात १३ उमेदवार शिल्लक राहिले आहेत. अशी माहिती भारत निवडणूक आयोगाने दिली आहे. नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या कालावधीत छाननी दरम्यान एकूण २५ उमेदवारांचे नामनिर्देशन वैध ठरवून स्विकृत करण्यात आले होते. कोकण विभाग पदवीधर मतदार संघातून अ‍ॅड घोन्साल्वीस जिमीम मॅतेस, निलिमा निरंजन डावखरे, केदार शिवकुमार काळे , संजय भाऊराव मोरे, अस्मा जावेद चिखलेकर, डॉ.प्रकाश पाडूरंग भांगरथ, अंकिता कुलदीप वर्तक, अमित जयसिंग सारिया, किशोर ओतरमल जैन, डॉ.भगवान अभिमानसिंग रजपूत, प्रा.राजेश संभाजी सोनावणे, अमोल रतन गौतम जगताप असे एकूण १२ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज मागे घेतले आहेत. यामुळे आता कोकण पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत १३ उमेदवार आपले राजकीय भवितव्य अजमावणार आहेत. यामध्ये काँग्रेसचे कीर रमेश श्रीधर, भाजपचे डावखरे निरंजन वसंत, भीमसेनेचे विश्वजित तुळशीराम खंडारे, अमोल अनंत पवार, अरुण भिकण भोई ,अक्षय महेश म्हात्रे, गोकुळ रामजी पाटील, जयपाल परशूराम पाटील,नागेश किसनराव निमकर, प्रकाश वड्डेपेल्ली, मिलिंद सिताराम पाटील, अ‍ॅड. शैलेश अशोक वाघमारे आणि श्रीकांत सिध्देश्वर कामुर्ती हे अपक्ष निवडणूक लढविणार आहेत.

## भाजपाने किंमत करुन घेतली

करून देणारा ठरला आहे. मोदींच्या लोकप्रियतेमुळे तळातील सामान्यांचा आवाज न ऐकणाऱ्या भाजपाला ही एक चपराक असल्याचे ऑर्गनायझर लेखात म्हटले आहे.

रतना शारदा यांनी आपल्या लेखात पुढे म्हटले की, राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सदस्य हे भाजपाचे मैदानावर काम करणारे कार्यकर्ते नाहीत. स्वंयसेवकांची मदत मागण्यासाठी भाजपाचे कार्यकर्ते आणि नेते कुठेतरी कमी पडले. विशेष म्हणजे, लोकसभा निवडणुकीचे पहिले दोन टप्पे झाल्यानंतर भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जेपी नड्डा यांनी एका मुलाखतीत राष्ट्रीय स्वंयसवेक संघावर केलेले भाष्य वादाचा विषय ठरले होते. अटल बिहारी वाजपेयी यांच्या काळातील भाजपा पक्ष आणि आताचा भाजपा पक्ष यात बराच फरक असल्याचे ते म्हणाले होते. भाजपा आता मजूबत पक्ष बनला असून आम्हाला संघाच्या मदतीची गरज उरली नसल्याचे ते म्हणाले होते. रतन शारदा यांनी ऑर्गनायझरच्या लेखात कुणाचेही नाव न घेता भाजपा नेत्यांच्या अतिआत्मविश्वासावर टीका केली आहे. लोकसभा निवडणूक २०२४ चे निकाल भाजपा कार्यकर्ता आणि नेत्यांना वास्तवाचे भान आणून देण्यास पुरेसे आहेत. भाजपा नेत्यांना हे कळले नाही की, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ४०० पार ची दिलेली घोषणा हे त्यांचे ध्येय आहे. विरोधकांचे नाही.?

# मूर्तिकार संघाच्या अध्यक्षपदी श्रीकांत सुर्वे



**। मुरूड । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यात गणेश मूर्ती तयार करण्याचे असंख्य कारखाने आहेत.लोकांना सुबक मूर्ती करून देत असताना मूर्तिकारांचे काही गहन प्रश्न असून ते शासनाकडून सोडून घेण्यासाठी मुरुड तालुक्यातील सर्व श्री गणेश मूर्तिकार एकत्र येऊन संघटना स्थापन केली आहे. शहरातील भंडारी बोर्डिंगच्या सभागृहात सर्व मूर्तिकार एकत्र येऊन त्यांनी आपली कार्यकारिणी निवडली आहे. मुरूड तालुका श्री गणेश मूर्तिकार संघाच्या अध्यक्षपदी श्रीकांत सुर्वे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

उपाध्यक्ष म्हणून मजगावचे सुप्रसिद्ध मूर्तिकार चंद्रकांत बुल्लू यांची निवड करण्यात आली आहे.सचिव संदीप मोकल, सह सचिव भार्गव कोटकर, खजिनदार विशाल पाटील, उप खजिनदार वैभव पाटील, सल्लागार म्हणून नथुराम तांबडकर, शैलेश रातवडकर यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, श्री गणेश मूर्तिकारांच्या समस्या शासनाकडून सोडवण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. गणेशमूर्ती तयार करताना प्रमुख अडचण जागेची येते. यासाठी एखादा कारखानदार ग्रामीण अथवा शहरात राहत असेल तर त्या प्रशासनाने जागा उपलब्ध करून दिली पाहिजे. त्याचप्रमाणे कारखानदारांना बँकेने कर्ज सुद्धा उपलब्ध करून दिली पाहिजे. काही वेळा अतिवृष्टीमुळे कारखानदारांचे मोठे नुकसान होते.

यासाठी शासनाने भरपाई मिळवून देण्यासाठी संघटना योग्य तो पाठपुरावा करणार आहे. त्याचप्रमाणे महावितरणने गणपती सणाच्या एक महिना अगोदर वीज जाता कामा नये, या सर्व मागण्या पूर्ण होण्यासाठी आम्ही पाठपुरावा करणार असल्याचे यावेळी सुर्वे यांनी सांगितले.



### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसी द्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**
**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे- गौळवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| | | | हे-आर-पॉ | रुपये पैसे |
| श्री. लक्ष्मण भिकन गाडे<br>श्री. तुकाराम नथु गाडे | १५ | ५ | ०-२०-०० | ० २० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. सही/-
कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं. ४, चौथा मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१
अ‍ॅड. जयेश संभाजी म्हसे
दिनांक :- १३/०६/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७
ई-मेल : adv.jayeshmhase@gmail.com

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M) / DIVN/MHD/Tech/E-Tender-23/ 2024-25Dtd.13.06.2024 **RFx No.**7000031481 | **Sub.:-** Invitation of SRM E-Tender for AMC of Air Conditioners at various substations under EHV (O&M) Dn. Mahad for the year 2024-25. | Rs.5,00,000/- (Including GST+ 1% Labour CESS) |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/ Tech/E-Tender-24/ 2024-25 Dtd.13.06.2024 **RFx No.** 7000031455 | **Sub:-** Invitation SRM E-tender for Electric tack welding at various locations under EHV Line Sub Division Mahad under EHV (O&M) Dn. Mahad. | Rs.16,45,135/- (Including GST+ 1% Labour CESS) |
| 3. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/ DIVN/MHD/Tech/ E-Tender-25/ 2024-25 Dtd.13.06.2024 **RFx No.** 7000031524 | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for providing outsource skilled manpower at various location under EHV (O&M Dn. Mahad for the period 01.06.2024 to 31.03.2025. | Rs.12,70,791/- (Including GST) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from 13.06.2024 @ 00:00 hrs to 19.06.2024 @23:59Hrs for above tender
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**.
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
**Note:** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL
**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### SRM E-TENDER NOTICE

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/ Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M) /DIVN/MHD/ Tech/E-Tender-18/2024-25 Dtd.13.06.2024 **RFx No.** 7000031499 | **Sub.:-** Invitation of SRM E-Tender for various regular preventative maintenance / emergency and breakdown works of various 220KV & 100KV Substations under EHV O&M Dn. Mahad for the year 2024-25. | **Rs. up to 7,00,000/- (Including GST + 1% Labour CESS)** |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from 13.06.2024 @ 00:00 hrs to 19.06.2024 @23:59Hrs for above tender
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**.
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
Note : All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.
**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

### जाहीर समन्स

**अलिबाग येथील मा. आय. व्ही. घाटगे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, यांच्या न्यायालयांत**

रे.मु.नं. ९२/२०२०
निशाणी क्रमांक ७५/ड
ने. ता.२७/०६/२०२४

मुकुंद दामोदर उर्फ दत्तात्रेय म्हात्रे वैगरे .....वादी
विरूध्द
केशव विठोबा ठाकूर वैगरे ...... प्रतिवादी

या जाहिर समन्सव्दारे प्रतिवादी नं. ९) प्रणाली प्रदिप साने, १०) समता सतिष घरत नं. ९ व १० रा. ठाकुरआळी, पो. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड, ११) रमेश शंकर राणे, १२) संजीव यशवंत खोत. नं. ११ व १२ रा. झिराड, ता. अलिबाग, जि. रायगड यांस कळवण्यात येते की, वादीने सदरचा दावा ठरावाकरता व इतर अनुषंगीक मागण्यासाठी दाखल केला आहे. परंतु प्रतिवादी नं. ९ ते १२ वर समन्सची बजावणी होत नाही. प्रतिवादी नं. ९ ते १२ स्वत:वर समन्सची बजावणी होवू देत नसल्यानेची खात्री वादी यांची झाल्याने प्रतिवादी नं. ९ ते १२ चे विरुध्द जाहिर समन्स व्दारे समन्सची बजावणी व्हावी यासाठी वादीने मा. न्यायालयात अर्ज दिला होता व तो मा. न्यायालयाने मंजूर केला आहे.

सबब, उपरोक्त प्रतिवादी नं. ९ ते १२ यांस या जाहिर समन्सव्दारे कळविण्यात येते की, आपण स्वत: अगर आपले नेमलेले प्रतिनिधी किंवा वकील यांचेमार्फत मा. आय. व्ही. घाटगे, ४ थे सह. दिवाणी न्यायाधिश क.स्तर अलिबाग यांचे न्यायालयात दि. २७/०६/२०२४ रोजी सकाळी ठिक १०.३० वाजता हजर राहावे व आपली कैफियत मांडावी अन्यथा प्रतिवादी नं. ९ ते १२ यांस सदरहू दाव्याचे कामी काहिएक सांगावयाचे नाही असे समजून दाव्याची सुनावणी एकतर्फी घेवून निर्णय दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ११/०६/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**सही/-** **सही/-**
**कनिष्ठ लिपिक** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, अलिबाग** (कोर्टाचा शिक्का) **दिवाणी न्यायालय व स्तर अलिबाग**

### जाहीर नोटीस

दि. १३/०६/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे मोठे वेणगाव, ता. कर्जत जि. रायगड येथील

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| ९९ | १ | ०-५३-०० लिहून देणार यांचे अविभक्त हिश्श्याची मिळकत ०-१६-०० | ८-४४ |
| १०३ | १ | १-३४-०० | १९-९४ |
| १०३ | ३ | ०-२०-०० | ३-४७ |

च्या शेतजमीन मिळकती विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

**अ‍ॅड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. ‘मातोश्री’ निवास आवळस,
ता. कर्जत, जि. रायगड भ्रमनध्वनी
क्र. ०९८८१५७९५५५

**निवडक**

## ट्रक चालकाचा मृत्यू

**खोपोली :** सोमवारी (दि.१०) सकाळी दहा वाजताच्या सुमारास यशवंतनगर येथील राहत्या घरातुन एका मुलीचे अपहरण झाल्याची घटना घडली आहे. या मुलीला अज्ञात व्यक्तीने तिच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन फुस लावुन पळवुन नेले असल्याचे तिच्या घरच्यांचे म्हणने आहे. याबाबत खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई अलोक खिसमतराव करीत आहेत.

## सेवालाल सोसायटीत चोरी

**नेरळ :** येथील सेवालाल सोसायटीच्या दुसऱ्या मजल्यावर चोरी झाल्याची घटना घडली आहे. येथील एका खोलीच्या दरवाजाचे अज्ञात चोरट्याने लॉक तोडून त्यावाटे आत प्रवेश केला. चोरट्याने स्वयंपाक खोलीत असलेल्या कपाटाचे लॉक तोडुन कपाटाचे आतील ड्रावर तोडत एकूण १ लाख १३ हजार रुपये किंमतीचे दागीने व रोख रक्कम चोरुन नेली आहे. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोसई लिंगप्पा सरगर हे करीत आहेत.

## गोवंशीय चोरट्याला अटक

**नेरळ :** चिकनपाडा-पाषाणे रस्त्यावरून एका टेम्पोत चोरून आणलेली तीन गोवंशीय जनावरे दाटीवाटीने कोंबुन त्यांना क्रूरपणे वागणुक देत त्यांची कत्तल करण्याच्या हेतूने घेऊन जात असताना माले गावाजवळ नेरळ पोलिसांनी सापळा रचून टेम्पो चालकाला अटक केली आली आहे. यात एकूण २ लाख ४५ हजार रुपये किंमतीचे बैल व गाय असे मिळून आले असून नेरळ पोलीस ठाण्यात चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास पोलीस हवालदार म्हात्रे करीत आहेत.

## प्रलंबित प्रश्नांसाठी प्रयत्न

**खरोशी :** पेण तालुका सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक व कर्मचारी संघटनेच्या सभेत प्रलंबित गटविमा, फंड व इतर राहिलेल्या निवृत्तीच्या रक्कम मिळण्यासाठी चर्चा करून प्राथमिक शिक्षणाधिकारी यांची भेट घेण्याचे ठरले असून लवकरात लवकर प्रश्न सोडवण्यासाठी जिल्हा अध्यक्ष अमरचंद पाटील व रविकांत ठाकूर यांनी मार्गदर्शन केले. या सभेला वि.भा.ठाकूर, गुरुनाथ पाटील, प्र.शं.म्हात्रे, गणेश थवई, मंगेश म्हात्रे, प्रदीप म्हात्रे, जगन्नाथ मोकळ, प.जा.म्हात्रे, बापूजी म्हात्रे, उज्वला निकम, सुगंधा म्हात्रे, आशा ठाकूर, रजनी ठाकूर आदी उपस्थित होते.

## अपघातात दुचाकीस्वार ठार

**पनवेल :** महानगरपालिकेच्या घंटा गाडीने दुचाकीस्वाराला धडक दिल्याची घटना घडली आहे. या धडकेत दुचाकी चालक जागीच ठार झाला आहे. अंजनीकुमार मौर्या (२२) असे मृत तरुणाचे नाव असुन खारघर हिरानंदानी उड्डाणपुलाजवळ हा अपघात झाला. घटनेची माहिती मिळताच खारघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत आरोपी वाहन चालक विकास पाटील (४४) याला खारघर पोलिसांनी अटक केली आहे. अंजनीकुमार मौर्या हा स्वीगी फुड ऑपसाठी काम करत होता.

# कर्जाच्या नावाखाली ग्राहकांची फसवणूक

## कठोर कारवाई करण्याची मागणी

**। उरण । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील अमर मोबाईल शॉपचे मॅनेजर सागर कोळी व प्रोपायटर अमर केंद्रे यांनी ग्राहकांची लाखो रूपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजय विजय पाटील, दीपक अशोक मोरे, रुपाली शैलेश किल्लेकर, सागर शरद वाघमारे, अनिल राजाराम घुटुकडे, जितेंद्र नारायण थळे अशी पीडितांची नावे असून हे सर्व उरणमधील रहिवासी आहेत. यांच्याव्यतीरीक्त शेकडो ग्राहकांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

पीडित ग्राहक उरण शहरातील कामठा रोडवरील मॅनेजर सागर कोळी व प्रोप्रायटर अमर केंद्रे यांच्या अमर ग्लोबल मोबाईल शॉपमध्ये वारंवार खरेदीविक्री करण्यासाठी येत असल्यामुळे त्यांच्यासोबत या ग्राहकांची ओळख झाली होती. यानंतर सागर कोळी याने या नागरिकांना वेगवेगळ्या तारखेला बोलावून त्यांना त्यांच्या नावाने कर्ज काढण्यासाठी ऑफर दिली व त्यापासुन त्यांना कौटुंबिक खर्चासाठी मदत म्हणुन फायदे मिळतील, असे आमिष दाखविले. तसेच, अमर केंद्रे यांनी या कर्जाबाबत ग्राहकांना आश्वासन दिल्यामुळे ग्राहकांनी सागर कोळी यांच्या शब्दांवर पुर्णपणे विश्वास ठेवला. ग्राहकांना देखील कौटुंबिक व मुलांच्या खर्चासाठी मदत मिळणार म्हणुन सागर व अमर यांना कर्ज काढण्यासाठी परवानगी दिली. तसेच, कर्जाचे सर्व हफ्ते सागर कोळी भरणा करेल, असे ग्राहकांना सांगितले. या गोष्टीला अमर केंद्रे यानेदेखील दुजोरा दिला.

यानंतर सागर कोळीने ग्राहकांच्या नावाने ऑनलाईन कर्ज काढले असून मागील काही महिन्यांपासुन हफ्त्याची रक्कम त्याने भरलेली नाही. त्यामुळे ग्राहकांना मोठया प्रमाणामध्ये आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. तसेच, या कर्जासाठी आश्वासन देऊन अमर केंद्रे याने अनेक सामान्य ग्राहकांची फसवणुक करुन फरार झाला आहे. तसेच, सागर कोळीने ग्राहकांच्या नावाने मोठ्या रक्कमेचे लोन काढले असुन याबाबत त्याला विचारणा केली असता, तुम्हाला काय करायचे आहे ते करा, असे सांगुन ग्राहकांना दमदाटी करीत आहे.

> फसवणूक झालेल्या तक्रारदारांनी माझी भेट घेतली आहे. अमर मोबाईल शॉपच्या अमर केंद्रे यांना याबाबत कळविले आहे. अमर केंद्रे यांनी सर्व ग्राहकांचे पैसे देतो असे कबूल केले आहे. अमर केंद्रे याला आठ दिवसांची मुदत दिली होती. फसवणूक झालेल्या नागरिकांचे पैसे त्यांना परत मिळवून देण्यासाठी प्रयत्न चालू आहेत.
> – राजेंद्र कोते पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, उरण




अशाप्रकारे अमर ग्लोबल मोबाईल शॉप येथील मॅनेजर सागर कोळी व प्रोप्रायटर अमर केंद्रे यांनी ग्राहकांचा विश्वासघात करुन अनेक सर्वसामान्य ग्राहकांची पुर्णपणे फसवणुक केली आहे. त्यांच्या फसवणुकीमुळे ग्राहकांना खुप मोठया प्रमाणामध्ये आर्थिक नुकसान सहन करावा लागत आहे. तरी पोलीस प्रशासनाने सागर कोळी व अमर केंद्रे यांच्याविरुध्द कायदेशीर कार्यवाही करावी व फसवणूक झालेल्या ग्राहकांना नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी पीडितांनी पोलीस प्रशासनाकडे केली आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

# बँक ऑफ महाराष्ट्रच्या एटीएमचे तिनेतेरा

**। कोलाड । वार्ताहर ।**

कोलाड नाका येथील बँक ऑफ महाराष्ट्रचे एटीएम हे एक महिन्यांपासून बंद असल्यामुळे येथील बँक खातेदारांची गैरसोय निर्माण झाली आहे. यामुळे येथील नागरिकांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

सद्या शाळा सुरु झाली असुन शालेय वस्तू खरेदी करण्यासाठी तसेच पावसाळा सुरु झाला असल्यामुळे शेतकरी बी बीयाणे व खते खरेदी करण्यासाठी बँकेत पैसे काढण्यासाठी गर्दी करीत आहते. तसेच, या बँकेचे एटीएम बंद असल्यामुळे त्वरित पैसे काढण्यासाठी गैरसोय निर्माण झाली आहे.



बँकेत जाऊन बँक खातेदाराला ठराविक वेळेतच पैसे काढता येतात. परंतु, आधुनिक काळातील धावपळीच्या युगात एटीएममुळे कोणत्याही वेळी तसेच कोणत्याही ठिकाणच्या बँकेत जाऊन पैसे काढता येतात. असे असले तरी इतर बँकेच्या एटीएममध्ये जाऊन पैसे काढले तर बँक खातेदाराला जादा चार्जेस भरावे लागत आहे. यामुळे याचा फटका बँक खातेदाराला बसत आहे. यामुळे कोलाडमधील बँक ऑफ महाराष्ट्र बँकेचे एटीएम त्वरित सुरु करावे, अशी मागणी बँक खातेदारांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

# भूमी अभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्यांचा दुष्काळ

## कामाच्या नावाने बोंबाबोंब

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यात सरकारी कार्यालयात कर्मचाऱ्यांचा कायम अभाव पाहायला मिळत आहे. कर्मचारी वर्गाची पदे रिक्त असल्याने ग्रामीण भागातील जनतेचे अतोनात हाल होत आहेत. सुधागड येथील भूमी अभिलेख कार्यालयातून सुटलेला नाही. सरकारी काम बारा महिने थांब या म्हणीप्रमाणे येथील नागरीकांना अनुभव येत आहेत.

उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात निमतादार एक पद, आवक जावक सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्याचे एक पद, छाननी लिपिक एक पद, दुरुस्ती लिपिक एक पद, शिपाई चार पद अशी पदे रिक्त आहेत. यामुळे कार्यालयाची कित्येक कामे रखडली जात आहेत. तसेच, अर्ज करून देखील




शेतकरी वर्गाच्या मोजण्या रखडल्या आहेत. या कार्यालयात जमीन मोजणीसाठी फक्त चार कर्मचारी आहेत. अश्या या भोंगळ कारभारामुळे शासनाचे तर नुकसान होतच आहे, त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील जनतेचे देखील नुकसान होत आहे. संबंधित विभागाने याकडे दुर्लक्ष न करता त्वरित रिक्त पदे भरावीत आणि कामचुकार कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. जेणेकरून सामान्य जनतेला त्रास सहन करावा लागणार नाही. याबाबत योग्य ती पावले उचलावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

# मुठे खरेदीसाठी खवय्यांची धडपड

**। सुकेळी । वार्ताहर ।**

सद्यपरिस्थितीत पावसाने थोड्याफार प्रमाणात तुरलक अशी सुरूवात केली आहे. या पावसाळ्याच्या सुरुवातीलाच मिळणारे मुठे व खेकडा हे मांसाहारी खाद्य शरीरासाठी अतिशय आरोग्यदायी समजले जाते. शेताच्या बांधावर आणी माळरानावर बिळातून बाहेर येणारे गावरान मुठे खरेदी करुन खाण्यासाठी खवय्ये आतुरलेले दिसुन येत आहेत. त्यामुळे बाजारात मुठे विक्रीसाठी येत असल्यामुळे खवय्यांची मोठी धडपड सुरू असतानाचे चित्र दिसत आहे.

पावसाचे आगमन झाले की अनेक माळरानावर तसेच शेतामध्ये हिरवेगार गवत दिसु लागते. त्यामुळे पावसाळा वगळता अन्य काळामध्ये बिळामध्ये राहणारे मुठे, खेकडे चारा गोळा करण्यासाठी बिळाबाहेर येत असतात. रात्रीच्या वेळेस रिमझिम पावसात हे मुठे आपल्या नांग्यानी



गवत तोडुन बिळात नेऊन निवांतपणे खात असतात. रात्रीच्या वेळी पाऊस पडण्यास सुरुवात झाल्यावर मुठे पकडण्यासाठी खवय्ये हातामध्ये गॅसबत्ती, बॅटरी तसेच सोबत मुठे ठेवण्यासाठी सिमेंटची पोती घेऊन रात्रभर माळरान व शेतामध्ये फिरून मुठे पकडतात. पावसाळ्याच्या सुरूवातीला मिळणाऱ्या या मुठ्यांवर खवय्ये तुटुन पडतात. मुंबई, पुणे आदी शहरांमध्ये राहणारे चाकरमानी लोक गावाकडुन मुठे घेऊन जाण्यासाठी हमखास गावी येत असतात.

# तहसील कार्यालयाची इमारत धोकादायक

**। म्हसळा । वार्ताहर ।**

म्हसळा येथील मुख्य प्रशासकीय इमारत म्हणजे तहसील कार्यालय (महसुलचे सर्व विभाग), पोलीस स्टेशन, परिक्षेत्र वन अधिकारी या तीनही कार्यालयाच्या इमारती धोकादायक आहेत. जंजीरा संस्थान कालीन या इमारतीला सुमारे १०० वर्षांची जुनी परंपरा आहे.

जिल्हाधिकारी रायगड यांच्या सूचनेवरून सार्वजनिक बांधकाम विभागाने अतिधोकादायक तसेच धोक्याची संभावना असलेल्या ठिकाणांची पाहणी केली होती. यात म्हसळा तालुक्यातील तहसील कार्यालयाची मुख्य इमारत वापरण्यास धोकदायक असल्याचे पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाने १७ मे रोजी तहसीलदार यांना दिले होते. तर, तहसीलदार म्हसळे यांनी तशाच पद्धतीची नोटीस तब्बल दहा दिवसांनी पोलीस स्टेशन आणि वनविभागाला दिली आहे.



तहसील कार्यालय नव्या जागेत उभे रहावे यासाठी तालुक्यातील ३८ गुंठेजागा दिली असून दोन वर्ष होऊनही तहसीलदार यांनी शासनाकडे निधीसाठी कुठेही विशेष पाठपुरावा न केल्यामुळे इमारतीचा प्रस्ताव लाल फितींत आडकला आहे. येथील कार्यालयांत रोजचे किमान ८० ते १०० कर्मचारी आणि विविध कामांसाठी येणारे जाणारे किमान ४०० ते ६०० नागरिकांची वर्दळ असते. तसेच, तालुका मुख्यालयातील महत्वाची कार्यालये म्हसळा नगरपंचायत क्षेत्रापासून दूर अन्यत्र स्थलांतरीत करु नये, अशी देखील नागरिकांची मागणी आहे.

# मजगांवचा पूल अपघाताला आमंत्रण



- जीर्ण पुलावरुन होतेय मासेमारी
- सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष
- उपाययोजना करण्याची मागणी

**। कोर्लई । वार्ताहर ।**

गेल्या अनेक वर्षांपासून मजगांव येथील जूना पूल कोसळलेला असून त्या पूलाच्या तुटलेल्या स्लॅबवर काही हौशी मासे पकडण्यासाठी आधार घेत आहेत. वेळप्रसंगी पूलावरील जीर्णावस्थेतील स्लॅब नदीत पडून अपघाताची शक्यता लक्षात घेऊन स्लॅब व पिलर काढून घेण्याची मागणी जोर धरीत आहे.

येथील तत्कालीन एकमेव दुवा असलेला हा पूल पडून अनेक वर्षे झाली. परंतु, यापूलावर जीर्णावस्थेत धोकादायक असलेले स्लॅब व पिलर तशाच अवस्थेत असून याकडे संबंधित बांधकाम खात्याचे दुर्लक्ष दिसून येते आहे. याठिकाणी पावसाळ्यात समुद्राच्या भरतीच्या वेळेत मोठ्या प्रमाणावर पाणी असते. याच पूलावर काही शौकिनांना अशावेळी मासेमारी करण्याचा मोह आवरत नाही. अशावेळी वेळप्रसंगी हे जीर्ण धोकादायक स्लॅब कोसळण्याची शक्यता लक्षात घेऊन याठिकाणी योग्यती उपाययोजना करण्याची मागणी जोर धरीत आहे.

**महानगर गॅस लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: एमजीएल हाऊस, ब्लॉक जी–33, वांद्रा कुर्ला संकुल, वांद्रा (पूर्व), मुंबई–400051.
**सीआयएन: L40200MH1995PLC088133**
दूरध्वनी: +91 22 6678 5000 I **ई–मेल:** info@mahanagargas.com I www.mahanagargas.com
MAHANAGAR GAS

**खुला जमिनीचा प्लॉट हवा आहे**

**महानगर गॅस लिमिटेड यांना खालील तपशीलानुसार एनएच66 (मुंबई गोवा महामार्ग) वर आपटे फाटा टोल पोस्ट ते जिते गाव (रायगड जिल्हा, पेण तालुका) या दरम्यान थेट विक्रीसाठी असलेला जमिनीचा खुला प्लॉट हवा आहे.**

| ठिकाण | प्लॉटचा आकार (अंदाजे) | जमिनीचे ठिकाण | ऑफर सादर करण्याची शेवटची तारीख आणि पत्ता |
|---|---|---|---|
| एनएच 66 वर | 4000-5000 चौ. मीटर | एनएच–66 वर आपटे फाटा टोल पोस्ट ते जिते गाव (रायगड जिल्हा, पेण तालुका) दरम्यान पनवेल ते गोवा प्रवास करताना उजव्या बाजूला | **01.07.2024 रोजी 1800** पूर्वी खालील पत्यावर: महानगर गॅस लिमिटेड,18वा मजला, सी38-39, पारीनी क्रेसेन्झो, वांद्रा–कुर्ला संकुल, वांद्रा – पूर्व, मुंबई–400 051. |

रस्त्याच्या कडेला 70 मीटरचा पुढचा खुला भाग असलेल्या स्पष्ट व कोणताही विवाद नसलेल्या वरील आकाराच्या प्लॉटसाठी इच्छुक पक्षकारांकडून (व्यक्ती/जमिन मालक/मुखत्यारपत्र धारक/मालकाने अधिकार दिलेले एजंटस) निविदा मागविण्यात येत आहेत. सदर प्लॉट **राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या** आवश्यकता पूर्ण करणारा असावा. देऊ करण्यात आलेल्या प्लॉटच्या जवळपास कोणत्याही उच्च व्होल्टेजच्या लाईन्स नसाव्यात,100 मीटरच्या परिसरात कोणत्याही शाळा/कॉलेज, प्रार्थनास्थळ नसावेत किंवा वरून किंवा खालून कोणतीही पाईप लाईन गेलेली नसावी. **ऑफर्स दोन निविदा पद्धतीने सिलबंद पाकिटात 01.07.2024 पर्यंत पाठवाव्यात. 1ल्या पाकिटावर तांत्रिक पाकिट (राष्ट्रीय महामार्ग 66 – जितेगाव जवळील प्लॉट)** असे लिहावे आणि त्यात ठिकाणाची माहिती, मालकीचा तपशील, नकाशा, प्लॉटच्या मालमत्तेचे ठिकाणाचा तपशील देणारा मुख्य प्लॅन, विक्रीसाठी देऊ करण्यात आलेले क्षेत्र, प्लॉटचे आकारमान, '7/12' उतारा किंवा तत्सम, एजंट असल्यास मुखत्यार पत्र/मुखत्यार पत्र धारक आणि दराव्यतिरिक्त इतर सर्व नियम व अटी असाव्यात. **2ऱ्या पाकिटावर किंमतीचे पाकिट (राष्ट्रीय महामार्ग 66 – जितेगाव जवळील प्लॉट)** असे लिहावे आणि त्यात युनिट दर/चौरस मीटर/एकुण रक्कम लिहावी. ही दोन्ही पाकिटे एका मोठ्या पाकिटात ठेवावीत आणि त्यावर **''एमजीएल साठी प्लॉट (राष्ट्रीय महामार्ग 66 – जितेगाव जवळील प्लॉट) –उघडू नये''** असे लिहावे आणि ते सिलबंद करून जीएम (सीॲण्डपी), महानगर गॅस लिमिटेड यांचेकडे वर नमूद करण्यात आलेल्या पत्यावर **01.07.2024 रोजी 1800 पूर्वी** पाठवावे.

ऑफर सादर करण्यासाठी मार्गदर्शनासह तपशीलवार नियम व अटींसाठी, कृपया आमच्या वेबसाईटला www.mahanagargas.com येथे भेट द्या. काही चौकशी करायची असल्यास, कृपया **''खुल्या प्लॉटची आवश्यकता एनएच66'' (जितेगाव)** असे नमूद करून info@mahanagargas.com येथे ईमेल पाठवावे.

**या जाहिरातीत काही सुधारणा/शुद्धिपत्रक असल्यास (काही असल्यास), ते आमच्या वेबसाईटवर www.mahanagargas.com येथे उपलब्ध/ प्रदर्शित करण्यात येईल** आणि अर्जदारांना ऑफर(र्स) सादर करण्यापूर्वी नियमितपणे आमची वेबसाईट पाहण्याची विनंती करण्यात येत आहे.

**महानगर गॅस लिमिटेड**
नोंदणीकृत कार्यालय: एमजीएल हाऊस, ब्लॉक जी–33, वांद्रा कुर्ला संकुल, वांद्रा (पूर्व), मुंबई–400051.
**सीआयएन: L40200MH1995PLC088133**
दूरध्वनी: +91 22 6678 5000 I **ई–मेल:** info@mahanagargas.com I www.mahanagargas.com
MAHANAGAR GAS

**खुला जमिनीचा प्लॉट हवा आहे**

**महानगर गॅस लिमिटेड यांना खालील तपशीलानुसार एनएच66 (मुंबई गोवा महामार्ग) वर (रायगड जिल्हा, माणगाव तालुका) या दरम्यान थेट विक्रीसाठी असलेला जमिनीचा खुला प्लॉट हवा आहे.**

| ठिकाण | प्लॉटचा आकार (अंदाजे) | रस्त्याचा पट्टा | येथून अंतर मोजले | ऑफर सादर करण्याची शेवटची तारीख आणि पत्ता |
|---|---|---|---|---|
| एनएच 66 वर | 4000-6000 चौ. मीटर | एनएच 66 वर माणगावच्या दिशेला रस्त्याच्या दोन्ही बाजूला सुमारे 1.5 कि.मी. | उसरघर येथे GAILचे आयपी स्टेशन | **01.07.2024 रोजी 1800** पूर्वी खालील पत्यावर: महानगर गॅस लिमिटेड,18वा मजला, सी38-39, पारीनी क्रेसेन्झो, वांद्रा–कुर्ला संकुल, वांद्रा – पूर्व, मुंबई–400 051. |

रस्त्याच्या कडेला 45 मीटरचा पुढचा खुला भाग असलेल्या स्पष्ट व कोणताही विवाद नसलेल्या शीर्षकासह वरील आकाराच्या प्लॉटसाठी इच्छुक पक्षकारांकडून (जमिन मालक – व्यक्ती /मुखत्यारपत्र धारक/मालकाने अधिकार दिलेले एजंटस) निविदा मागविण्यात येत आहेत. प्लॉटच्या जवळपास कोणत्याही उच्च व्होल्टेजच्या लाईन्स नसाव्यात, 100 मीटरच्या परिसरात कोणत्याही शाळा/कॉलेज, प्रार्थनास्थळ नसावेत किंवा वरून किंवा खालून कोणतीही पाईप लाईन गेलेली नसावी. **ऑफर्स दोन निविदा पद्धतीने सिलबंद पाकिटात 01.07.2024 पर्यंत पाठवाव्यात. 1ल्या पाकिटावर तांत्रिक पाकिट (राष्ट्रीय महामार्ग 66 – उसरघर जवळील प्लॉट)** असे लिहावे आणि त्यात ठिकाणाची माहिती, मालकीचा तपशील, नकाशा, प्लॉटच्या मालमत्तेचे ठिकाणाचा तपशील देणारा मुख्य प्लॅन, विक्रीसाठी देऊ करण्यात आलेले क्षेत्र, प्लॉटचे आकारमान, '7/12' उतारा किंवा तत्सम, एजंट असल्यास मुखत्यार पत्र/मुखत्यार पत्र धारक आणि दराव्यतिरिक्त इतर सर्व नियम व अटी असाव्यात. **2ऱ्या पाकिटावर किंमतीचे पाकिट (राष्ट्रीय महामार्ग 66 – उसरघर जवळील प्लॉट)** असे लिहावे आणि त्यात युनिट दर/चौरस मीटर/एकुण रक्कम लिहावी. ही दोन्ही पाकिटे एका मोठ्या पाकिटात ठेवावीत आणि त्यावर **''एमजीएल साठी प्लॉट (राष्ट्रीय महामार्ग 66 – उसरघर जवळील प्लॉट) –उघडू नये''** असे लिहावे आणि ते सिलबंद करून व्हाईस प्रेसिडेंट (प्रोजेक्टस), महानगर गॅस लिमिटेड यांचेकडे वर नमूद करण्यात आलेल्या पत्यावर **01.07.2024 रोजी 1800 पूर्वी** पाठवावे.

ऑफर सादर करण्यासाठी मार्गदर्शनासह तपशीलवार नियम व अटींसाठी आणि ठिकाणाचा निर्देशक योजनेचा नकाशा यासाठी, कृपया आमच्या वेबसाईटला www.mahanagargas.com येथे भेट द्या. काही चौकशी करायची असल्यास, कृपया **''खुल्या प्लॉटची आवश्यकता उसरघर''** असे नमूद करून info@mahanagargas.com येथे ईमेल पाठवावे.

**या जाहिरातीत काही सुधारणा/शुद्धिपत्रक असल्यास (काही असल्यास), ते आमच्या वेबसाईटवर www.mahanagargas.com येथे उपलब्ध/ प्रदर्शित करण्यात येईल** आणि अर्जदारांना ऑफर(र्स) सादर करण्यापूर्वी नियमितपणे आमची वेबसाईट पाहण्याची विनंती करण्यात येत आहे.

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ जून

१) श्री. विलास दत्तात्रे नाईक
चोरोंडे, अलिबाग, १३-६-१९५२

२) श्री. अविनाश काशिनाथ घरत
चौल, अलिबाग, १३-६-१९६०

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**



**कै. अनंत गजानन काठे, स्मरणार्थ, किहीम, अलिबाग**



**कै. श्रीमती सुलभा मधुसूदन केळकर, स्मरणार्थ, अलिबाग**

# विहिरींच्या कामांना मंजुरी कधी?

## पनवेलमध्ये भीषण पाणीटंचाई, प्रशासनाचे अपयश

**। पनवेल । वार्ताहर ।**

**जून महिना संपत आला आहे. तरीही पनवेल परिसरात तीव्र उकाडा जाणवू लागला आहे. पनवेल तालुक्यातील अनेक आदिवासी वाड्यांसह गावांमध्ये देखील तीव्र पाणीटंचाई जाणवत आहे. काही गावांमध्ये दिवसाआड पाणी सुरू करण्यात आले आहे. पनवेल पंचायत समिती पाणीपुरवठा विभागामार्फत रायगडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे ४९ विंधण विहिरींसाठी प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. काही दिवसात पावसाळा सुरू होईल तरी देखील विंधण विहिरींच्या कामांना मंजुरी मिळत नाही. त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.**



पनवेल तालुक्यातील ४९ गाव, वाड्यांमध्ये विंधण विहिरींचा प्रस्ताव अलिबाग येथे पाठवण्यात आला. मात्र या विंधण विहिरींबाबत प्रशासनाने तात्काळ कार्यवाही केली नाही. परिणामी, पाणीटंचाईची भीषण दाहकता परिसरात जाणवू लागली आहे. धरणाच्या आजूबाजूला आदिवासी वाड्या आहेत. त्या आजही तहानलेल्या आहेत. त्यांना काही किलोमीटर पायी चालत जाऊन पाणी आणावे लागते. थोड्या पाण्यात देखील त्यांना समाधान मानावे लागते.

गाढेश्वर धरण बाजूला असूनही या धरणाचे पाणी आदिवासी वाड्यांना प्यायला मिळत नाही. त्यामुळे आदिवासी भागाकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात आला आहे. परिणामी, प्रशासन दरबारी असलेला प्रस्ताव लालफितीत अडकला असल्याचे समोर आले आहे. बेसुमार होणारी वृक्षतोड, जंगलतोड यामुळे पाणी खोलवर गेले आहे. त्याचा फटका गाव आणि गाववाड्यांना बसत आहे. काही ठिकाणी तर महिलांना रात्रभर जागुन पाणी भरावे लागते. वास्तविक पाहता मार्च-एप्रिल महिन्यात पाणीटंचाई सुरू होते. याच वेळेला विंधण विहिरी मंजूर होऊन त्या खोदणे आवश्यक आहे. मात्र प्रशासन गतिमान नसल्याने याला उशीर होत आहे. तालुक्यातील नवीन विंधण विहिरीसाठी ४९ गावांसाठी अंदाजपत्रकीय ५६ लाख रुपये खर्च आहे. यावर्षी हा खर्च कागदावरच राहतो की काय अशी साशंकता वाटत आहे.

# पावसाळी साहित्य व शालेय साहित्यांनी दुकाने सजली



**। खांब । वार्ताहर ।**

अवघ्या दोन दिवसांवर सुरू होणाऱ्या शाळा व रिमझिम स्वरूपात बसणाऱ्या पावसाच्या पार्श्वभूमीवर पावसाळी हंगामात लागणारे साहित्य व शालेय साहित्यानी दुकाने सजली आहेत. साहित्य खरेदी करण्यासाठी ग्रामीण भागातील व शहरी भागातील दुकानात मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

शालेय विद्यार्थी व त्यांचे पालकही खरेदीमध्ये व्यस्त झाले आहेत. वाढत्या महागाईची झळ बसली असून प्रत्येक वस्तूंची किंमत १० ते २० % वाढली आहे. तरी खरेदीचा उत्साह मात्र दिसून येत आहे. रोहा शहर, कोलाड, खांब, सुतारवाडी, धाटाव, नागोठणे, कोकबण, चणेरा यासह आदी छोट्या-मोठ्या बाजारपेठा ग्राहकांच्या गर्दीने फुलल्या आहेत.

# पाणी योजनेच्या प्रस्तावाला वनविभागाची परवानगी



**भुवनेश्वर येथील जल जिवन मिशन योजनेत काही शासकीय अडचणी होत्या त्यानंतर लगेच लोकसभा निवडणूक लागल्याने आचार संहिता लागू झाली होती. आता मात्र, या योजनेला वनविभागाने परवानगी दिली आहे.-**
**उप वनसंरक्षक आप्पासाहेब निकत ,रोहा**

**। रोहा । वार्ताहर ।**

तालुक्यातील वरसे हद्दीतील भुवनेश्वर येथे २०२३ साली जल जिवन मिशन अंतर्गत सुमारे साडेतीन कोटी रुपये खर्चाची योजना सुरु होती. परंतु, काही तांत्रिक कारणांमुळे वनविभागाच्या परवानगीची अडचण होती. ग्रामस्थांची पाण्यासाठी प्रखर मागणी लक्षात घेत व शासकीय अडचणी दुर करुन अखेर उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत यांनी परवानगी दिली. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण असून त्यांनी आभार मानले.

# रोजगार हमीची कामे ठेकेदाराला?

**। पोलादपूर । वार्ताहर ।**

महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेअंतर्गत पोलादपूर तालुक्यात सिमेंट रस्ते, पेव्हर ब्लॉक आणि अंर्तगत रस्ते अशी विकास कामे २४ गावांमध्ये मंजूर झाली आहेत. त्यासाठी सरकारने २ कोटी ९५ लाख रुपये मंजूर केले आहेत.

त्यामुळे मंजूर गावांमधील बेरोजगार तरुण, अशिक्षित व्यक्ती, अल्भूधारक आणि महिलांच्या हाताला रोजगाराची आयती संधी चालून आली होती. मात्र, ही कामे ठेकेदारी पद्धतीने केली जाणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे. त्यामुळे लोकसेवा प्रतिष्ठान चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून येते.

# दीपाली पाटील यांची प्रशासकीय अधिकारीपदी निवड

**। पनवेल वार्ताहर ।**

दीपाली रामचंद्र पाटील यांना परीक्षेत घवघवीत यश मिळाले असून त्यांची करनिर्धारण व प्रशासकीय अधिकारी पदी निवड झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पनवेल तालुक्याच्यावतीने दीपाली यांचा सत्कार करण्यात आला. दीपाली पाटील या पनवेल तालुक्यातील देवीचापाडा येथील रहिवाशी आहेत.

यांप्रसंगी शिवसेना तालुका प्रमुख विश्वास पेटकर, विभाग प्रमुख प्रमोद पाटील, उपविभाग

प्रमुख परशुराम भोपी, युवासेना तालूका अधिकारी मनोज कुंभारकर, युवासेना पनवेल विधानसभा चिटणीस जीवन पाटील, शाखा प्रमुख विलास पाटील, शाखा प्रमुख व सरपंच नितलस संदीप पाटील, सुनिल काठे, दिलीप पाटील, रामदास फडके तसेच देवीचापाडा गावातील संजय पाटील, ज्ञानदेव पाटील, नंदकुमार साखरे, सूर्यकांत पाटील, विकास पाटील, दिनेश म्हात्रे, विजय पाटील दीपाली यांचे वडील रामचंद्र पाटील, भाऊ प्रदीप पाटील हे उपस्थित होते. यावेळी पनवेल तालुक्याच्या वतीने दीपाली यांना शुभेच्छा देण्यात आल्या.



# कोलाड परिसरात पावसाची तुफान फटकेबाजी



**। कोलाड । वार्ताहर ।**

परिसरात बुधवारी १२ जुन रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास पावसाची तुफान फटकेबाजी पहावयास मिळाली. त्यामुळे आंबेवाडी बाजारपेठेत क्षणातच पाणीच पाणी झाले होते. बहुतांश ठिकाणी साचलेल्या पाण्यातून मार्ग काढताना वाहन चालकांसह पादचाऱ्यांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला. मुंबई-गोवा हायवे वरील आंबेवाडी बाजारपेठेतील निकृष्ठ दर्जाच्या रस्त्यामुळे नुकताच येथील नागरिकांनी रास्ता रोको केला तर दुसऱ्याच दिवशी तुफान पावसामुळे पुरस्थिती निर्माण झाली. याचा नाहक त्रास वाहनचालकांसह प्रवाशी वर्ग तसेच येथील नागरिकांना सहन करावा लागत आहे.

### पावसामुळे आंबेवाडी बाजारपेठत पाणीच पाणी

आंबेवाडी बाजारपेठेतील रस्त्याचे काम हे धोकादायक आहेच परंतु त्याचप्रमाणे या बाजारपेठेतील रस्ता खाली आणि गटार वर असल्यामुळे थोडा जरी पाऊस पडला, तरी या संपूर्ण बाजारपेठेत पाणीच पाणी होऊन पुरस्थिती निर्माण होते.

सतत पाऊस पडला तर काय परिस्थिती निर्माण होईल, असा प्रश्न आहे. ठेकेदाराची मनमानी सुरु असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. प्रशासनाने लक्ष घालून नागरिकांची त्रासातून सुटका करावी अशी मागणी आहे.

# करंजाडेवासीयांचा १८ जून रोजी रास्ता रोको

**। नवीन पनवेल । वार्ताहर ।**

करंजाडे वसाहतीला गेल्या काही वर्षांपासून पाणीटंचाईचे ग्रहण लागलेले आहे. पाण्यावाचून नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. १० जून पर्यंत पाणी पुरवठा सुरळीत केला नाही, तर रास्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा करंजाडे वासीयांनी दिला होता. १० जूनपर्यंत सिडकोने पाण्याबाबत काहीही हालचाल केली नाही. त्यामुळे १८ जून रोजी करंजाडे वसाहतीच्या पाठीमागील बाजूस असलेल्या जेएनपीटी रोडवर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते विनोद साबळे यांनी दिली.



करंजाडे वसाहत सिडकोने वसवली आहे. मात्र मूलभूत सुविधा पुरवण्यात सिडको अपयशी ठरल्याचे दिसून येते. पुरेसे पाणी मिळत नसल्याने येथील रहिवाशी हैराण झाले आहेत. पाण्याअभावी नागरिकांचे हाल सुरू आहेत. या संदर्भात गेल्या काही दिवसांपूर्वी विनोद साबळे यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांनी सभा आयोजित केली होती. पाणीपुरवठा सुरळीत केलेला नाही. पाणी नसल्याने कामे उरकायची कशी असा सवाल महिलांनी या निमित्ताने उपस्थित केला आहे.

रविवार ९ जून रोजी करंजाडे वसाहतीतील नागरिकांची बैठक पार पडली. यावेळी १८ जून रोजी जेएनपीटी रोड येथे रस्ता रोको आंदोलन करण्याचे ठरवण्यात आले. जोपर्यंत पाणी प्रश्न सुटत नाही तोपर्यंत आंदोलन चालूच ठेवणार असल्याचे विनोद साबळे यांनी सांगितले. करंजाडे वसाहतीतील नागरिकांनी सिडकोला पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी दहा तारखेपर्यंत वेळ दिली होती. मात्र पाणीपुरवठा सुरळीत न झाल्याने रास्ता रोको आंदोलन १८ जूनला करण्यात येणार आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने सर्व करंजाडेवासीयांनी एकत्रित येण्यासाठी नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे.

रोजच्या गरजेच्या ज्या गोष्टी आहेत त्या पाण्यामुळे करता येत नाहीत. त्यामुळे आम्ही आता रस्त्यावर उतरणार आहोत. जास्त ताकदीने महिला या मोर्चात सहभागी होणार आहेत. आम्हाला पाणी विकत आणावे लागत आहे. रस्त्यावर उतरून रास्ता रोको करून सिडकोला जाब विचारणार असल्याचा इशारा महिलांनी दिला.

पाणीटंचाईमुळे करंजाडेकर त्रस्त झाले आहेत. कोणत्याही परिस्थितीत पाणी मिळाल्याशिवाय आता शांत बसायचे नाही, असा निर्धार नागरिकांनी केला असल्याचे रामेश्वर आंग्रे यांनी सांगितले.

# वृक्षारोपण व संवर्धन उपक्रम

**नवीन पनवेल :** नुकत्याच संपन्न झालेल्या जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने नवीन पनवेल सेक्टर ६ येथील जीसी अस्पिरा २०६ सोसायटीच्या व्यवस्थापन समितीमार्फत वृक्षारोपणाचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी कडुलिंब, उंबर, वड, जांभूळ, बकुळी, आंबा, गुलमोहर, अशोक, अशा १०० हून अधिक वृक्षांचे रोपण करण्यात आले. वृक्षांच्या संवर्धनाची कायम स्वरूपी जबाबदारी सोसायटीमधील सर्व सदस्यांनी घेतली असल्याचे सोसायटीचे अध्यक्ष बळीराम साबळे यांनी स्पष्ट केले आहे.

# सुरेश पोसतांडेल यांची राज्य प्रदेशाध्यक्षपदी फेरनिवड

**। उरण । वार्ताहर ।**

महाराष्ट्र नगरपरिषद नगरपंचायत कर्मचारी संवर्ग कर्मचारी संघटना (शासन मान्यता प्राप्त) या संघटनेची कार्यकारणीची सर्वसाधारण सभा मंगळवार ( दि.११ ) रोजी मुंबई येथे पार पडली. या बैठकीत सुरेश पोसतांडेल यांची राज्य प्रदेशाध्यक्षपदी पुन्हा

फेरनिवड करण्यात आली. उपाध्यक्षपदी गिरीश डुबेवार, सरचिटणीसपदी अनिल पवार, कोषाध्यक्ष लालू सोनकांबळे, कार्यकारी अध्यक्ष रामेश्वर वाघमारे, प्रमुख मार्गदर्शक व कोर कमिटी सदस्य दीपक रोडे, विश्वनाथ घुगे, धर्मा खिल्लारे, संघटक विजय भोंडवे यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांची संघटनेवर नेमणूक करण्यात आली.

सुरेश पोसतांडेल यांना शुभेच्छा देऊन अभिनंदन करण्यात येत आहे. कार्याध्यक्ष नितीन कासारे, रायगड जिल्हाध्यक्ष सुनिल जाधव, शहर सरचिटणीस विजय पवार, शाखा उपाध्यक्ष हर्षद कांबळे, कोषाध्यक्ष संजय पवार, खजिनदार महेश जाधव आदी उरण नगर परिषदेच्या पदाधिकारी कर्मचाऱ्यांनी सुरेश पोसतांडेल यांना पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

# ११२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील मापगाव येथे मंगळवारी ११ जून २०२४ रोजी मापगाव येथील धर्मशाळेत ग्रामविकास परिवर्तन आघाडी मापगावतर्फे मापगाव पंचक्रोशीतील १० वी व १२ वी उत्तीर्ण झालेल्या ११२ गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते विद्येची देवता असलेल्या सरस्वती देवीच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करत कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यानंतर सोगाव येथील प्रसिद्ध तैलचित्रकार चंद्रकला कदम यांची कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून निवड करण्यात आली. १० वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांमध्ये साईश सतीश पेडणेकर याने ९३% गुण मिळवले, तर रोशनी सूरज घरत हिने ९२.८०% गुण मिळविले आणि वैष्णवी महेंद्र हुमणे हिने ९२.४०% मिळविले तसेच सेजल प्रदीप मंडल हिने ९१.०७% गुण मिळविले. त्याचबरोबर १२ वी मध्ये आर्या मंगेश सोनवणे हिने ९०% गुण मिळविले, तर साहिल तारानाथ सुर्वे याने ८६.३३% गुण मिळविले तसेच मृदुला संतोष घरत हिने ८१.६६% गुण मिळविले आहेत. अशा मापगाव पंचक्रोशीतील एकूण ११२ विद्यार्थी व विद्यार्थिनींचा या कार्यक्रमात रोख पारितोषिक, प्रशस्तीपत्र, स्कुल बॅग व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सर्व विद्यार्थांना स्कुल बॅग, प्रशस्तीपत्र, पुष्प देण्यात आले. उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचे मोरे, प्रसिद्ध तैलचित्रकार चंद्रकला कदम क्लासेसचे चोंढीचे संतोष राऊत यांनी कौतुक करत मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ग्रामपंचायत सदस्य विजय भगत, माजी उपसरपंच अशोक नाईक, माजी उपसरपंच वसीम कुर, अखिल भारतीय हक्क ग्राहक संरक्षण परिषदेचे राष्ट्रीय सचिव बाबू थळे आदी उपस्थित होते.

# पत्रकारांचा वृक्ष लागवडीचा संकल्प

**। कर्जत । वार्ताहर ।**

यंदा उन्हाळ्यात कर्जत तालुक्यातील तापमानाने ४५ अंश गाठले होते. त्यामुळे सर्वांचीच चिंता वाढली होती. गेल्या काही वर्षांपासून तापमानात सातत्याने वाढत होताना दिसत आहे. यावर उपाय योजना करण्यासाठी तालुक्यात एक हजार वृक्षांची लागवड करण्याचा संकल्प पत्रकारांनी केला आहे. यासाठी त्यांना वनविभाग मदत करणार आहे.

कर्जत हा निसर्गसंपन्न तालुका आहे. डोंगर दुर्गम भाग हा तालुक्याचा अविभाज्य भाग आहे. येथे हरित पट्टा असल्याने औदयोगिक क्षेत्राला थारा देण्यात आलेला नाही. तर याच तालुक्यात माथेरानसारखे जगप्रसिद्ध थंड हवेचे ठिकाण आहे. पर्यटनाचा तालुका अशी कर्जत तालुक्याची ओळख आहे. तालुक्यात मोठ्या प्रमाणात फार्महाऊस आणि रिसॉर्ट आहेत. मात्र, जगभरातील वृक्षतोडीची समस्या कर्जत तालुक्यातदेखील आहे. याचा परिणाम मागील काही वर्षांपासून ऋतूंवर होऊ लागला आहे.

वृक्षारोपणासाठी वन विभागाने मदतीचा हात दिला आहे. वृक्षारोपण केल्यानंतर त्या वृक्षांची जबाबदारी संबंधित पत्रकाराची राहणार आहे.

# शालेय पोषण आहार झाला अधिक सकस

**। रायगड । प्रतिनिधी ।**

सरकारी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या शालेय पोषण आहार योजनेत (प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना) आता १५ विविध प्रकारच्या पाककृती निश्चित करण्यात आल्या आहेत. नवीन पाककृतींची अंमलबजावणी ही २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून केली जाणार आहे. यामुळे आता विद्यार्थ्यांना दर दोन आठवड्यांत दररोज नवे पदार्थ देणे शक्य होईल. अनेक



विद्यार्थी शिजवलेला आहार पूर्णत: खात नसल्याने त्यांना गरजेप्रमाणे तांदळाचे पदार्थ तयार करून दिल्याने यातून तांदूळ, डाळी, कडधान्ये याचीही बचत होणार आहे.

शालेय पोषण आहारात पहिली ते पाचवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिनेयुक्त, तसेच सहावी ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिनेयुक्त असा आहार दिला जातो. या योजनेसाठी केंद्राकडून सवलतीच्या दरामध्ये प्रतिदिन प्रती विद्यार्थी प्राथमिक वर्गासाठी १०० ग्रॅम व उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम तांदूळ आणि त्यापासून बनविलेले पदार्थ दिले जातात. यात आता स्थानिक अन्नधान्य, तृणधान्य व इतर पदार्थांचा समावेश केला आहे. यासाठी शालेय शिक्षण विभागाने नेमलेल्या आहार तज्ज्ञांच्या समितीने सूचना करून नवीन पाककृती सुचविल्या होत्या.

- आठवड्यातून एक दिवस अंडी किंवा केळी देण्याची तरतूद
- अंडी न खाणाऱ्या विद्यार्थ्यांना व्हेजिटेबल पुलाव अथवा फळ
- शाळांतील परसबागेतील भाजीपाल्यांचा वापरही केला जाईल.
- आठवड्यातील चार दिवस तांदळाची खीर,एक दिवस नाचणी सत्त्व

### नवे पदार्थ

**व्हेजिटेबल पुलाव, मसालेभात, मटार पुलाव, मूगडाळ खिचडी, चवळी खिचडी, चणा पुलाव, सोयाबीन पुलाव, मसुरी पुलाव, अंडा पुलाव, मटकीची उसळ, गोड खिचडी, मूग शेवगा वरण भात, तांदळाची खीर, नाचणीचे सत्त्व, मोड आलेले कडधान्य यांचा समावेश आहे.**

# मूर्तिकार संघाच्या अध्यक्षपदी श्रीकांत सुर्वे

**। मुरूड । प्रतिनिधी ।**

मुरूड तालुक्यात गणेश मूर्ती तयार करण्याचे असंख्य कारखाने आहेत.लोकांना सुबक मूर्ती करून देत असताना मूर्तिकारांचे काही गहन प्रश्न असून ते शासनाकडून सोडून घेण्यासाठी मुरुड तालुक्यातील सर्व श्री गणेश मूर्तिकार एकत्र येऊन संघटना स्थापन केली आहे. शहरातील भंडारी बोर्डिंगच्या सभागृहात सर्व मूर्तिकार एकत्र येऊन त्यांनी आपली कार्यकारिणी निवडली आहे. मुरूड तालुका श्री गणेश मूर्तिकार संघाच्या अध्यक्षपदी श्रीकांत सुर्वे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

उपाध्यक्ष म्हणून मजगावचे सुप्रसिद्ध मूर्तिकार चंद्रकांत बुल्लू यांची निवड करण्यात आली आहे.सचिव



संदीप मोकल, सह सचिव भार्गव कोटकर, खजिनदार विशाल पाटील, उप खजिनदार वैभव पाटील, सल्लागार म्हणून नथुराम तांबडकर, शैलेश रातवडकर यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.

यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष श्रीकांत सुर्वे यांनी आपल्या भाषणात सांगितले की, श्री गणेश मूर्तिकारांच्या समस्या शासनाकडून सोडवण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. गणेशमूर्ती तयार करताना प्रमुख अडचण जागेची येते. यासाठी एखादा कारखानदार ग्रामीण अथवा शहरात राहत असेल तर त्या प्रशासनाने जागा उपलब्ध करून दिली पाहिजे. त्याचप्रमाणे कारखानदारांना बँकेने कर्ज सुद्धा उपलब्ध करून दिली पाहिजे. काही वेळा अतिवृष्टीमुळे कारखानदारांचे मोठे नुकसान होते. यासाठी शासनाने भरपाई मिळवून देण्यासाठी संघटना योग्य तो पाठपुरावा करणार आहे.

निवडक

## पावने दोन लाखांचा दंड

**रायगड :** सातत्याने वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलीसांमार्फत कारवाईचा बडगा उगारण्यात येतो. ११ जून २०२४ रोजी २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत वाहतुक शाखेचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २६४ जणांवर कायदेशीर कारवाई केली आहे. पोलीसांनी त्यांच्याकडून तब्बल १,८१,९०० रुपयांचा दंड आकारला आहे. पोलीसांकडून अशा प्रकारची कारवाई होत असते.

## २ लाखांचे गंठण चोरले

**खालापूर :** दांडफटा ते लोधीवली प्रवास दरम्यान मुंबई-पुणे जुन्या हायवे रोडवर बसमध्ये खालापुर येथील महिला फिर्यादी हे त्यांच्या पतीसह चांभार्ली ते वरोसे असा प्रवास करीत होते. त्यावेळी फिर्यादी यांच्या बॅगमधील छोटया पॅकेटमध्ये ठेवलेले दोन लाख २२ हजार किमतीचे सोन्याचे गंठण अज्ञात चोररटयाने चोरी केले. चोरी झाल्याचे कळताच त्यांनी याबाबत खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी अधिक तपास पोसई बहाडकर हे करीत आहेत.

## आरोपीची नवी शक्कल

**महाड :** शासनाची दिशाभुल करण्याकरीता व गाडीवर असलेला प्रलंबित दंड भरावा लागु नये याकरीता एकाने भन्नाट शक्कल लढवली आहे. स्विप्ट डिझायर या वाहनाचा खरा नंबर एम.एच. ०१ सी.जे. २८२७ हा असतानाही वाहनाची नंबरप्लेट बदलुन त्याठिकाणी एम.एच.४३ ए.सी. ९७५० ही बनावट नंबरप्लेट लावुन शासनाची दीशाभुल केली. सदरची घटना ३० एप्रिल रोजी घडली. या प्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. अधिक तपास पोसई विशाल पवार करीत आहेत.

## एटीएम फोडण्याचा प्रयत्न

**रोहा :** पोलीस ठाणे हद्दीत एक्सल स्टॉप जवळ बँक ऑफ महाराष्टाचे एटीएम आहे. १० जून रोजी येथे एक अनोळखी इसम आला. त्याने तोंडाला कपडा गुंडाळला होता. हातातील लोखंडी हत्याराने मशीनच्या समोरील बाजुस असलेले लॉक तोडुन चोरी करण्याचा त्याने प्रयत्न केला. याबाबत रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोहवा श्रीधर अधीकारी हे करीत आहेत. अशा घटनेने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण पसरले आहे.

## रस्त्याच्या कामाचा त्रास

**पनवेल :** तालुक्यातील महात्मा गांधी रोडच्या कामाला सुरुवात करण्यात आली आहे. मात्र, त्या ठिकाणी राहत असलेल्या नागरिकांना त्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याच्या शेजारी असणाऱ्या नाल्यांवर लाकडी फळ्या टाकून त्यांना आपल्या घरात जावे लागत आहे. एखादी लाकडी फळी तुटल्यास अपघात होण्याची अधिक शक्यता आहे. विशेष करुन लहान मुले, गरोदर महिला, महिला आणि वयोवृध्द नागरिकांना जाता-येताना कसरत करावी लागत असल्याचे दिसून येते.

# डंम्पिंग ग्राऊंडचे स्थलांतर रखडले

**। तळा । वार्ताहर ।**

**शहर आणि समस्या हे जणू आता एकप्रकारे समीकरणच बनले आहे. तळा शहरालगत असलेल्या डंम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. तळा नगरपंचायतीने डंम्पिंग ग्राऊंडची व्यवस्था तळा धरणाजवळ केली आहे. शहरातील सर्व गोळा केलेला ओला व सुका कचरा एकत्रित या ठिकाणी टाकला जातो. मात्र, डंम्पिंग ग्राऊंड सभोवती संरक्षक भिंत न बांधल्यामुळे मोकाट गुरे, कुत्रे व पक्षांनी कचरा पसरला जात आहे. त्यामुळे या परिसरात सर्वत्र दुर्गंधी पसरलेली आहे.**



- **डंम्पिंग ग्राऊंडचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर**
- **पाणीपुरवठा करणाऱ्या बोअरवेलला लागूनच डंम्पिंग ग्राऊंड**

जवळच तहसिल कार्यालय असल्याने येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांना या दुर्गंधीचा सामना करावा लागतो. तसेच डंम्पिंग ग्राऊंड शेजारीच निम्म्या शहराला पाणी पुरवठा करण्यासाठी बोअरवेल मारण्यात आली आहे. डंम्पिंग ग्राऊंडवर टाकलेला हा कचरा कुजून त्यातील घाण पाणी जमिनीत मुरले जात आहे. त्यामुळे याचा परिणाम मानवी आरोग्यावर होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या डंम्पिंग ग्राऊंडचे स्थलांतर शहरातील राणेचीवाडी येथे नगरपंचायतीच्या मालकी हक्क असलेल्या जागेत होणार असल्याचे नगरपंचायत प्रशासनाकडून सांगितले गेले होते. त्यानुसार त्या ठिकाणचे कामही पूर्ण करण्यात आले आहे. मात्र, डंम्पिंगला ग्रामस्थांच्या असलेल्या विरोधामुळे अद्यापही धरणा शेजारीच शहरातील कचरा टाकण्यात येत आहे. त्यामुळे तळा शहरातील कचऱ्याची समस्या बिकट होत चालली आहे.

काहीवेळा हा कचरा जाळला जात असल्याने मोठ्या प्रमाणावर प्रदूषण होऊन पर्यावरणाचा प्रश्न निर्माण होत आहे. त्यामुळे सदर डंम्पिंग ग्राऊंडचे लवकरात लवकर स्थलांतर करुन यातून सुटका करावी, अशी मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे.

# पत्रकाराच्या घराची वीज कापली

- **कुटूंब दोन दिवस अंधारात,**
- **महावितरण अभियंत्याचा प्रताप**

**। कोर्लई। वार्ताहर ।**

ऑनलाइन तक्रार केल्याचे कारण पुढे करत महावितरणच्या अभियंत्याने चक्क पत्रकाराला धमकावल्याचे समोर आले आहे. अभियंत्याने दोन दिवस त्याच्याच घरची वीज कापली असल्याचा प्रकार मुरुड तालुक्यात घडला आहे.

सतीश खरात असे त्यांचे नाव आहे. मुरुडच्या महावितरण ग्रामीण विभागाचे ते अभियंता आहेत. त्यांनी पत्रकाराच्या घराची वीज कापल्याने पत्रकाराचे कुटुंब सुमारे ४८ तास अंधारात होते. वीज कापल्याने घरातील फ्रिजमधील दूध, भाजीपाला, अन्नाची नासाडी झाली. त्यांना फार मनस्ताप सहन करावा लागला. ऑनलाइन केलेल्या तक्रारीचे निवारण न करता वीज ग्राहक पत्रकार संतोष रांजणकर यांना अंधारात ठेवले. पत्रकारांबरोबर हे वीज कर्मचारी अशा प्रकारे वागतात तर सामान्य विज ग्राहकाचे काय? असा सवाल जनमानसातून उठत आहे. ग्राहकांच्या सुविधेसाठी महावितरण ॲप आणि १९१२ तक्रार नंबर उपलब्ध करून दिला आहे. या ॲपचा वापर गेले कित्येक वर्ष पत्रकार संतोष रांजणकर करीत आलेले आहेत. या ॲपवर तक्रार केल्यानंतर स्थानिक कर्मचाऱ्यांचा कॉल येतो. ते सांगतात की ऑनलाईन तक्रार करू नका, काय असेल ते आम्हाला सांगा. सतत ऑनलाईन तक्रार करत असल्यामुळे अभियंता सतीश खरात यांनी पत्रकाराच्याच घरची वीज कापली होती. पत्रकार बाहेरगावी गेले असताना ही करामत केली होती. घरी परतल्यावर घरातील वीज नसल्याचे लक्षात आले. ऑनलाईन तक्रार दाखल केली. २४ तास झाले तरी तक्रारीचे निवारण झाले नाही.



अखेरीस जुन्या अभियंत्यांचे जे नंबर होते ते लागत नव्हते एका मित्राकडून या नवीन अभियंता सतीश खरात यांचा नंबर मिळवला. त्यांना संपर्क करून विचारले असता ते म्हणाले, माहिती आहे, तुला मी ओळखतो. तुझं काय रेकॉर्ड आहे ते माहिती आहे. कशाला ऑनलाईन तक्रार करतोस, असे धमकावले. पेण अभियंता मुलानी यांच्याकडेही तक्रार केली होती. पत्रकार संघटनेने जाहीर निषेध व्यक्त केला आहे. खरात यांच्याशी संपर्क झाला नाही.

## समाजाकडून गुणवंतांचा सत्कार

**पाली/गोमाशी :** रायगड विभागीय सुतार समाज संघ मुंबई ठाणे यांच्यावतीने मोफत वह्या वाटप तसेच गुणवंतांचा सत्कार कार्यक्रम नुकताच मुलुंड विद्या मंदिर मुंबई या ठिकाणी पार पडला.

इयत्ता १० वी आणि १२ वीमध्ये ८० टक्के पेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कुमार तन्मय तुळशीराम सुतार यास १० वी मध्ये ९३ टक्के गुण, तर ८ वी मध्ये पूर्वा संदीप सुतार हिस ८२ टक्के गुण मिळाले. सर्वांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. या कार्यक्रमासाठी सुतार समाजाचे ३५ विद्यार्थी उपस्थित होते. त्यांना वह्या वाटप करून त्याना प्रोत्साहित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले.

# दहिवली-मालेगाव पुलाच्या कामाला सुरुवात

**। नेरळ । वार्ताहर ।**

कर्जत तालुक्यातील मालेगाव दहिवली येथे उल्हास नदीवर असलेल्या पुलाच्या जागी नवीन पूल बांधण्यात येणार आहे. राज्याच्या अर्थ संकल्पात या पुलाचे काम मंजूर करण्यात आले होते. अखेर या पुलाचे काम सुरु झाले आहे.




उल्हास नदीवरील मालेगाव दहिवली येथील पूल नेरळ कळंब राज्यमार्ग रस्त्यावरील महत्वाचा पूल समजला जातो. राज्यात रायगडाचे बॅरिस्टर अ. र. अंतुले यांच्या मुख्यमंत्री पदाच्या कालावधीत या पुलाची निर्मिती झाली होती. त्यावेळी नेरळ कळंब या रस्त्यावरील ग्रामस्थ आणि कर्जत पंचायत समितीचे सभापती पदावर असलेले श्रीराम पाटील यांनी तेथे पूल व्हावा म्हणून राज्याचे मुख्यमंत्री अंतुले यांच्याकडे पुढाकार होता. निर्मिती झाली आणि पावसाळ्यात नेरळ जवळच्या गावात थांबून राहण्याची वेळ संपली होती. गेली ४० हुन अधिक वर्षे उभ्या असलेल्या मालेगाव दहिवली येथील पुलावरून दरवर्षी पावसाळ्यात पाणी जात असते. त्यामुळे पूल निकामी होऊ लागला असून धोकादायक देखील बनला आहे. मागील दोन वर्षांपूर्वी तर सलग तीन दिवस या पुलावरून महापुराची पाणी पावसाळ्यात वाहत होते.

त्यामुळे या ठिकाणी नवीन पूल बांधण्यात यावा अशी मागणी कर्जत पंचायत समितीचे अमर मिसाळ यांनी सतत पाठपुरावा सुरु ठेवला होता. त्यांच्या पाठपुराव्यामुळे उल्हास नदीवरील मालेगाव दहिवली येथील पुलाचे काम मंजूर झाले आहे. मागील वर्षी पावसाळ्यात पुलाची पाहणी करण्यासाठी आलेले आमदार थोरवे यांनी स्थानिक लोकांना नवीन पुलाची मंजुरी देऊन निर्मिती घेतली जाईल असे जाहीर केले होते. त्यानुसार कर्जत विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांनी राज्याच्या अर्थसंकल्पात तब्बल २२ कोटींचा निधी मंजूर करण्याचे आश्वसन पार पाडले आहे.या पुलाच्या सर्व निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्या असून पावसाळा सुरु होण्याआधी या पुलाच्या कामाला सुरुवात झाली आहे.

आता उल्हास नदीवर मालेगाव दहिवली येथे ११० मीटर लांबीचा पूल बांधला जाणार असून सध्या अस्तित्वात असलेल्या जुन्या पुलाच्या बाजूला हा नवीन पूल बांधला जाणार आहे. धामोते गावाच्या बाजूने पुलाच्या पिलरचे काम सुरु झाले आहे. अमर मिसाळ यांच्या संकल्पना असलेले संत तुकाराम महाराज यांचे स्मारक उभे राहणार आहे. त्यामुळे नवीन पुलाच्या निर्मिती बरोबर स्मारकदेखील येथील परिसरातील सौंदर्यात भर पाडणार आहे.

## सरपंचपदासाठी होणार रस्सीखेच

**नागोठणे :** श्रीमंत ग्रामपंचायत अशी ओळख असलेल्या रोहा तालुक्यात नेहमीच चर्चेत राहणाऱ्या नागोठण्याजवळील ऐनघर ग्राम पंचायतीच्या सरपंच कलावती राजेंद्र कोकळे व उपसरपंच किशोर नावळे यांनी दिलेल्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या सरपंच व उपसरपंच पदाची निवडणूक गुरुवारी (दि. १३) होत आहे.

यासाठी ग्रामपंचायत कार्यालयात सदस्यांच्या सभेचे आयोजन दुपारी २ वाजता करण्यात आले आहे. सरपंच व उपसरपंच पदासाठीचे नामनिर्देशनपत्र सभेच्या वेळेपूर्वी २ तास आधी म्हणजेच सकाळी १० ते १२ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयातच देण्यात येणार असल्याचेही सदस्यांना पाठविलेल्या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे.

# श्रीवर्धन पोलिसांची मोठी कारवाई

**४ गाई आणि १८ बैल हस्तगत**

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

राज्यात गोवंशबंदीचा कायदा लागू होऊन सुध्दा गुरांची अनधिकृतपणे कत्तल करणाऱ्यांना कायद्याचे कोणतेही भय न राहिल्याची घटना श्रीवर्धनमध्ये घडल्याचे दिसते.

श्रीवर्धन शहराला लागूनच असलेल्या आराठी येथील मुस्लीम मोहल्ल्यामध्ये एका गुप्त खबऱ्याबाबत पोलिसांना माहिती मिळाली होती की, या ठिकाणी कत्तलीसाठी आणलेली गुरे क्रूरतेने डांबून ठेवलेली आहेत. त्यानंतर श्रीवर्धन पोलिसांनी त्या ठिकाणी छापा टाकून सदरच्या ४ गाई व १८ बैल ताब्यात घेऊन आरोपी अजमत रशीद नारकर याच्यावरती गुन्हा दाखल केला आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून आराठी परिसरामध्ये गुरांची कत्तल केली जाते. याची कुणकुण पोलिसांना लागली होती. सदरची गुरे एका छोट्याशा गोठ्यामध्ये आखूड दोरखंडाने बांधून ठेवण्यात आली होती. त्यांची चारा पाण्याची कोणतीही व्यवस्था त्या ठिकाणी करण्यात आलेली नव्हती. सदर आरोपीने त्या गुरांना क्रूरपणे वागणूक दिल्याचे यातून निष्पन्न होत आहे. याप्रकरणी श्रीवर्धन पोलीस ठाण्यातील पोलीस कृष्णहरी बालाजी कदम यांनी फिर्याद दिल्यावरून ठाणे अंमलदार पी.एम. सुळके यांनी पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे यांच्या मार्गदर्शनाखाली सदर फिर्याद दाखल करून घेतली आहे.

याप्रकरणी श्रीवर्धन पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. या गुन्ह्याचा अधिक तपास श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक उत्तम रिकामे हे करीत आहेत.

# बससेवा ठेकेदाराच्या मनमानी कारभारामुळे बंद

**। खोपोली । वार्ताहर ।**

नगरपरिषद हद्दीत शहर बस प्रवासी वाहतूक संबंधीत ठेकेदाराने बंद केली आहे. त्यामुळे खोपोली नगरपरिषद हद्दीतील नागरिकाची गैरसोय झाली असून संबंधित ठेकेदाराच्या मनमानी कारभाराबाबत प्रवासी नाराजी व्यक्त करत असून संबंधित ठेकेदारावर लवकरात लवकर कारवाई करत बस सेवा सुरू करण्याची मागणी होत आहे. प्रवाशांची गैरसोय करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

> **ठेकेदाराने अचानकपणे बस सेवा बंद करत नागरिकांची गैरसोय करण्याचा प्रयत्न केल्याने या गंभीर समस्येची याची दखल घेऊन नगरपरिषदद्वारे कठोर कार्यवाही सबंधित ठेकेदारवर करण्यात येणार आहे. तर सिटी बससेवा बंद कालावधीमध्ये नागरिकानी नगरपरिषदेस सहकार्य करावे.**
> **डॉ.पंकज पाटील**
> **मुख्याधिकारी तथा प्रशासक**
> **खोपोली नगरपरिषद**



खोपोली शहरातील नागरिकांना अल्प दरात खोपोली शहरातील विविध भागात प्रवास करता यावा म्हणून खोपोली नगरपरिषदेच्या वतीने १ मे २०१३ रोजी बस सेवा सुरू केली होती, त्यामुळे खोपोली शहरातील नागरिकांना या बससेवेच्या माध्यमातून दिलासा मिळाला होता. तर खोपोलीकर नगरपरिषदेच्या या कारभाराबाबत समाधान व्यक्त करत होते.

शहर परिवहन सेवेत असलेल्या सिटी बसचा ठेका सुधीर रोडलाईन याना चालविणे कामी देण्यात आला आहे. सदर ठेकेदारची आजपर्यंत थकीत रॉयल्टी ७६,९६,३९१ रूपये, भुभाडे २,४९,५९१ रूपये, विजबिल ८०,२५० रूपये थकीत आहे. संबंधित ठेकेदारांनी २५ ऑगस्ट २०२१ रोजी शेवटची रॉयल्टी २,२४,००० रूपये, भुभाडे २,४९,५९१रूपये, विजबिल ८०,२५० रूपये नगरपरिषद फंडात जमा केली आहे. त्यानंतर आजपर्यंत कोणतीही थकीत रॉयल्टी रक्कम, भुभाडे आणि विज बिल नगरपरिषद फंडात जमा केले नाही. तर इतके थकीत रक्कम येणे असतानादेखील संबंधित ठेकेदारांनी अचानक बस सेवा बंद करून खोपोली नगरपरिषद हद्दीतील नागरिकाची गैरसोय केले असून नगरपरिषदेस वेठीस धरण्याचा ठेकेदार प्रयत्न करीत आहे.

## मतदान केंद्र देण्याची मागणी

**पनवेल :** कोकण विभाग पदवीधर निवडणूक २०२४ च्या अनुशंगाने पनवेल विभागात जास्तीत जास्त मतदान केंद्र उपलब्ध करणे बाबत व कामोठे व खारघर शहरात एक मतदान केंद्र देण्याची मागणी राष्ट्रवादी पदवीधर सेल तर्फे अनंत वारे यांनी केली आहे. निवडणूक आयोग संकेत स्थळानुसार ठाणे नंतर रायगड जिल्ह्यातील मतदार नोंदणी जास्त आहेत. त्यातही रायगड मधील पनवेल तालुक्यातील अंदाजे १६ हजार मतदार नोंदणी आहे. या अनुशंगाने पनवेल विभागात जास्तीत जास्त मतदान केंद्र उपलब्ध करावेत व कामोठे व खारघर या शहरात प्रत्येकी एक -एक मतदान केंद्र उपलब्ध करावेत अशी मागणी मुख्य निवडणूक आयोगाकडे अनंत वारे यांनी केली आहे.

# खरेदीसाठी विद्यार्थ्यांची धावपळ



**। उरण । वार्ताहर ।**

१५ जूनपासून उरण येथील शाळा सुरू होत असून पालक व विद्यार्थी शालेय साहित्य खरेदीसाठी गर्दी करत आहेत. उरण शहरात असलेले बुक स्टॉलवर गर्दी वाढत आहे.

शहरातील बुक स्टॉलमध्ये मोठ्या चित्रकला वही, प्रयोग वही, नव्या वर्गाची पाठ्यपुस्तके, टिफिन, पेन, पेन्सिल, कंपास पेटी, पाण्याची बाटली, खोडरबर, रोकयंत्र, पुस्तके अनहर, गम यासारख्या वस्तूंची खरेदी करण्यासाठी पालक व मुले दुकानात गर्दी करत आहेत.

चित्रपट कलाकार, बीटीएस कलाकार क्रिकेट व इतर खेळाडू, धबधबे, डोंगादऱ्या असे नैसर्गिक देखावे, देश विदेशातील उंच व प्रसिद्ध इमारती, स्थापत्य नमुने, कार्टून अशी एकापेक्षा एक सरस मुखपृष्ठ असलेली चित्र मुलांना आकर्षित करत आहेत.

उरण शहरातील मिलन बुक स्टॉल येथे लॉंग बुक व नोट बुक होलसेल भावाने आम्ही विकत आहोत, असे असे मिलन बुक स्टोल चे परबत मेर यांनी सांगितले. शाळा लवकरच सुरु होणार असल्याने खरेदीसाठी गर्दी होत आहे.

# २८ धरणांमध्ये २३ टक्केच पाणीसाठा

- **रायगडकरांना पावसाची प्रतीक्षा**

**। अलिबाग । वार्ताहर ।**

राज्यात मान्सून येऊन एक आठवडा लोटला आहे. मात्र म्हणावा तसा पाऊस बरसलेला नाही. त्यामुळे नागरिकांसह शेतकरी चिंतातुर झाला आहे. रायगड जिल्ह्यातील २८ धरणात २३.१५ टक्के जलसाठा शिल्लक आहे. ९ धरणात दहा टक्क्यांहून कमी पाणी साठा शिल्लक आहे. त्यामुळे पावसाने अशीच दडी मारल्यास जिल्ह्यातील पाणी प्रश्न पेटण्याची शक्यता आहे.

रायगड जिल्ह्यात मुरुड (१), तळा (१), रोहा (१), पेण (१), अलिबाग (१), सुधागड (५), श्रीवर्धन (३), म्हसळा (२), महाड (४), कर्जत (२), खालापूर (३), पनवेल (३), उरण (१) या तेरा तालुक्यात २८ धरणे बांधली गेली आहेत. या धरणातून जिल्ह्यातील नागरिकांना पाणी पुरवठा केला जातो.



जिल्ह्यातील २८ धरणात ६८.२६१ दलघमी पाण्याच्या साठ्याची क्षमता आहे. मात्र सध्या या धरणांमध्ये केवळ २३ टक्के पाणी साठा शिल्लक राहीला आहे. चिंताजनक बाब म्हणजे यातील ९ धरणांमध्ये दहा टक्क्याहून कमी पाणी साठा शिल्लक आहे. त्यामुळे या धरणांच्या पाण्यावर अवलंबून असलेल्या नागरिकांचे हाल होत आहेत.

गेल्यावर्षी रायगड जिल्हयात पाऊस सरासरी इतका झाला होता. धरण परिसरात चांगला पाऊस पडल्याने सर्व धरणे ही शंभर टक्के भरली होती. परंतु मार्च महिन्यातच धरणातील पाणीपातळी खाली जाण्यास सुरुवात झाली. सध्याचा धरणातील पाणीसाठा पाहता, पावसाला उशीर झाला तर पाणी समस्या गंभीर होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

० ते १० टक्के फणसाड, श्रीगाव, कोंडगाव, घोटवडे, ढोकशेत, कोथुर्डे, उन्हेरे, अवसरे, डोणवत धरणात ० त १० टक्केच पाणी शिल्लक आहे. सुतारवाडी, कवेळे, रानवली, पाभरे, खैरे, साळोख, भिलवले, कलोते-मोकाशी, पुनाडे येथील धरणांमध्ये ११ ते ३० टक्के इतका पाणीसाठा शिल्लक आहे तर ३१ ते ५० टक्के पाणी हे वावा, कार्ले, वरंध, मोरबे, बामणोली या धरणात आहे. समाधानाची बाब म्हणजे ५१ ते ६० टक्के पाणी हे आंबेघर, कुडकी, संदेरी, उसरण येथील धरणात आहे.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **सहारा ट्रॅव्हल्स अलिबाग मध्ये स्थानिक ड्रायव्हर पाहिजे वय २५ ते ४५( Jsw duty) ९२७०५६०४५६**

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

# काजवा महोत्सवातून निसर्गमुक्तीचा आनंद

***। पनवेल । वार्ताहर ।***

***पावसाळ्याच्या सुरुवातीला आपल्याला खूप साऱ्या गोष्टींमध्ये निसर्गात बदल झालेले दिसतात. यातलाच एक अतिशय सुंदर आणि अगदी कुठल्याही माणसाचे मन मोहून टाकेल असा एक बदल पावसाच्या अगदी सुरुवातीला फक्त काही दिवस दिसतो तो म्हणजे काजवे. पूर्वी जेव्हा शहरांमध्ये लाईटचा झगमगाट नव्हता त्यावेळेला अगदी शहरांच्या जवळ सुद्धा आपल्याला काजवे दिसायचे परंतु मधल्या काही वर्षांमध्ये हे प्रमाण खूप कमी झाले आहे.***

*पनवेल येथील अनुभूती नावाची संस्था अश्या पर्यावरण पूरक कार्यक्रमांचे आयोजन करत असते, अनुभूतीचे सुदीप आठवले असे कार्यक्रम आयोजित करताना येणाऱ्या पर्यटकांना काय सूचना द्यायच्या हे पर्यटक जेव्हा कार्यक्रमासाठी यायचे नक्की करतात, तेव्हापासून एक शिस्त घालून दिल्यास, तसेच पर्यावरण रक्षण हे मुख्य ध्येय ठेवून आयोजन केल्यास प्रतिसाद मिळू शकतो हे त्यांनी दाखवून दिले आहे. आठवले स्वतः निसर्गप्रेमी असून अनेक वन्यजीव जे लोकांच्या घरात येतात त्यांना पकडून पुनः निसर्गात मुक्त करण्याचे समाजकार्य गेले अनेक वर्षे करत आहेत. तसेच गेले अनेक वर्ष निसर्ग जनजागृतीचे काम करीत आहेत. लोकांनी निसर्गात जाऊन निसर्गाला कुठलीही हानी न होता वन्यजीव बघायचे असल्यास त्यांना संपर्क साधावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.*



*पावसाळ्याच्या सुरुवातीचा काळ हा अनेक सजीवांप्रमाणेच काजव्यांचाही मिलनाचा काळ आहे आणि त्याच दरम्यान काजव्यांचे नर मादीला शोधत इकडे तिकडे उडत असतात. गेल्या पाच ते दहा वर्षात अनेक ठिकाणी काजवा महोत्सव सुरू झाले परंतु केवळ पैसे मिळवणे आणि त्याबाबतची सविस्तर माहिती नसल्यामुळे अनेक ठिकाणी या काजवा महोत्सवामुळे काजव्यांच्या जीवन क्रमावर घालाच घातला गेला असे म्हटल्यास वावगे ठरू नये. आपल्याला काजव्यांचा जीवनक्रम जर नीट समजून घ्यायचा असेल आणि तसेच त्यांना त्रास न देता त्यांची मजा घ्यायची असेल त्यासाठी संबंधीत आयोजकांनी काजव्याबाबत सविस्तर माहिती आणि काय करावे काय करू नये हे सुरुवातीपासूनच येणाऱ्या पर्यटकांना सांगायला हवे. काजवे बघताना आपण कटाक्षाने काही गोष्टींचे पालन करणे अतिशय गरजेचे आहे.*

*सध्या मोबाईल हातात आल्यामुळे प्रत्येक जण आपले फोटोग्राफीची हाऊस पुरी करून घेत असतो. त्यामुळे काजवे दिसले की, आपण त्याचे फोटो काढायला धावतो, परंतु काजव्यांचा प्रकाश इतका कमी असतो की तो सहजा सहजी या फोटोमध्ये येत नाही मग आपण फ्लॅश वापरतो तसेच काहीजण हाऊस म्हणून काजव्यांना पकडतात बाटल्यांमध्ये भरतात यांनीही त्यांना त्रास होतो आत्ता नुकतेच भंडारदऱ्यामध्ये काही हौशी पण माहिती नसलेल्या काही पर्यटक आणि आयोजकांमुळे काजवे अक्षरशः पायाखाली तुडवले गेले होते. आपण असेच वागत राहिलो तर त्याचाच परिणाम म्हणून लवकरच काजवा महोत्सव बंद सुध्दा होतील.*

# स्मृती सभेचे आयोजन

। रसायनी । वार्ताहर ।

हिज होलिनेस मोरान मोर अथानेशियस योहान प्रथम मेट्रोपोलिटन यांच्या स्मरणार्थ स्मृती सभेचे आयोजन करण्यात आले होते. ८ मे २०२४ रोजी मेट्रोपोलिटन यांचे निधन झाले होते. त्यांनी जीवनभर केलेल्या सद्कृत्यांची आठवण करून त्यांना श्रद्धांजली देण्यासाठी स्मृती सभा ठेवण्यात आली होती. यावेळी मुंबई डायोसिसचे विकार जनरल फादर जोना टी यांनी प्रार्थनेद्वारे सभेची सुरुवात केली तसेच डायोसिस बिशप हिजं ग्रेस मर्टीन मोर एप्रेम यांनी भाषणाद्वारे मेट्रोपोलीटन यांना श्रद्धांजली वाहिली. या सभेमध्ये फादर संकेत मासिह, फादर डेविड राज, फादर विकास लोखंडे, फादर आनंद वर्मा, फादर योहान गावित आदी मान्यवर उपस्थित होते. मेट्रोपॉलिटन



यांचा जन्म ८ मार्च रोजी निरणम, केरळ येथे झाला होता. त्यांनी गरीब मुलांसाठी बीओएच प्रकल्प सुरू केल. गोरगरिबांच्या भल्यासाठी सीडीपी प्रकल्प सुरू केले. आरोग्य केंद्र सुरू केले, इंग्लिश मिडीयम स्कूल सुरु केले, हॉस्पिटल सुरू केले. नैसर्गिक आपत्तीमध्ये पूरग्रस्त, भूकंपग्रस्त इत्यादिसाठी तत्काळ मदत प्रदान केली.



## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


## जाहीर नोटीस

**अलिबाग येथील दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर सो. यांचे कोर्टात...**

स्पे.मु. ३१/२४

रविंद्र रघुनाथ पाटील - वादी

विरुद्ध

राजेंद्र कृष्णा पाटील - प्रतिवादी

मे. अलिबाग कोर्टातील स्पे. मु. ३१/२४ हा दावा
१. रविंद्र रघुनाथ पाटील
२. राजकुमार सुभाष पाटील
३. रियाज उमर कुरेशी
४. हसमत महम्मद कुरेशी
५. लताबाई रघुनाथ पाटील

सर्व राहणार शेखाचे गांव व केतकीचा मळा यांनी स्वतः करीता व शेखाचे गांव व केतकीचा मळा या गांवचे प्रतिनिधी म्हणून मौजे, केतकीचा मळा गट नं. ४७ या मिळकतीबाबत राजेंद्र कृष्णा पाटील, वगैरे इसमांविरुद्ध खरेदीखते रद्द होण्यासाठी निरंतर ताकीदीसाठी दिलेला आहे.

माननीय कोर्टाने वादींना प्रातिनिधीक स्वरुपात दावा दाखल करण्याची परवानगी दिलेली आहे.

या दाव्याचेकामी कोणताही वादी अथवा प्रतिवादी पणात सामिल व्हायचे असेल तर नेमलेल्या तारखेस दिनांक १८/०६/२०२४ रोजी स्वत: अगर वकीलांमार्फत हजर राहून हक्क दाखवणारे सर्व कागदोपत्रे, पुरावा सादर करुन हजर व्हावे.

येणेप्रमाणे सी.पी.सी. ॲक्ट १ रुल ८ प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

अलिबाग.

दिनांक : १२/०६/२०२४

कनिष्ठ लिपिक, दिवाणी न्यायालय व. स्तर, अलिबाग — अधीक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर, अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकांन बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**

**१) मौजे - मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.-आर.-पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| चंडीकेश्वर शर्मा | २९ | २ | ०-४२-३० | १ | ७५ |
| | | पैकी हे.-आर.- पॉ.०-१९-६० इतके क्षेत्र | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- १३/०६/२०२४
मो.नं. ९०२८९८२२७७

कार्यालयीन पत्ता:- फ्लॅट नं. ४, ए विंग, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका कार्यालय शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१.

ई-मेल : adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

दिनांक :- १२/०६/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील यांनी मौजे उद्धर ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे - उध्दर ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | स. नं./हि.नं. | क्षेत्र. हे आर | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. सुधिर गणपत मुंब्रे वगैरे | ५ १०२ १ | ०-६१-७० | ६-९४ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी बक्षिसपत्र मृत्यपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहीवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहीवाट असल्यास सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुरव्यासहीत १४ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशील सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण पाली - सुधागड
दिनांक :- १२/०६/२०२४

सही/-
**श्री. राहुल जे. भंडारी**
ॲडव्होकेट
रा. पाली ता. सुधागड जि. रायगड
मोबा नं. ९४२३२३२८६२, ८२३७१५६४६९

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, वा मुरुड, जि. रायगड)
ज.म.र अर्ज ९०/२०२४

## जाहीर नोटीस

गालीब मोहम्मद उलडे,
रा. मु. पो. विहूर, — अर्जदार
ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत विहर, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहिर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार गालीब मोहम्मद उलडे, यांचा जन्म दिनांक ०१/०६/१९७४ रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे विहूर, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत विहूर कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३(३) अन्वेय अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार गालीब मोहम्मद उलडे, यांचा दिनांक ०१/०६/१९७४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकीलांमार्फत मे. न्यायालयांत दि.१६/०७/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजून अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ११/०६/२०२४ रोजी माझ्या सहिनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरूड-जंजिरा

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक प्रकाश अनंता घाडगे व अनंता धर्मा घाडगे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-जांमरूंग, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| जुना स.नं. २०२/६<br>नवीन स.नं. १३८/६ | १-३६-०० हे आर पॉ | ०-८१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १३/०६/२०२४

ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अतुल शरद कांबळे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे- मोठे वेणगाव, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ६०/२ | ०-२९-०० हे आर पॉ | ४-७५ |
| ६०/३/अ/२ | ०-२०-०० हे आर पॉ | ०-१२ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १३/०६/२०२४

ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक अतुल शरद कांबळे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे कुशिवली, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | एकुण क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| ३५/१/ब | ०-४५-८० हे आर पॉ | ३-५३ |
| ३५/१/ड | ०-१३-१० हे आर पॉ | १-३७ |
| ३५/१/क | ०-१७-२० हे आर पॉ | २-५० |
| ३५/२/ब | ०-२०-०० हे आर पॉ | २-०० |
| ३६/१ | ०-३७-९० हे आर पॉ | ४-२२ |
| ३६/३ | ०-५८-८० हे आर पॉ | ९-१३ |
| ३६/७ | ०-४९-५० हे आर पॉ | ८-१४ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : १३/०६/२०२४

ॲड. निलेश कान्हु मोरे मोबा. ९८२२६९११०९
ॲड. वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर, अमराई रोड, कर्जत ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :- ८३/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. नादिरा बेगम इस्माईल राऊत
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. नादिरा नासिर मुल्ला
लग्नानंतरचे नाव — अर्जदार
वय ५१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा. मु. पो. मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. नादिरा बेगम इस्माईल राऊत - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. नादिरा नासिर मुल्ला - लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगाव, जि. रायगड. येथे दि. ११/०२/१९७३ रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला दि. ०२/०५/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ११/०२/१९७३ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. नादिरा बेगम इस्माईल राऊत - लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. नादिरा नासिर मुल्ला-लग्नानंतरचे नाव यांचा जन्म मौजे मोर्बा, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ११/०२/१९७३ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. १२/०६/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची शेतजमीन मिळकत त्याचे मालक श्री. श्रीकांत अनंत दिवेकर व इतर १० यांचेकडून कायमची विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

**- मिळकतीचे वर्णन :-**

**मौजे मोठे वेणगांव, ता. कर्जत, जि. रायगड येथील शेतजमीन मिळकत.**

| भूमापन क्रमांक | उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६२ | २ | ०.२९.००<br>इतर ०.०१.०० | ०-३७ |
| | **एकूण** | **०.३०.००** | |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकाराचा हक्क, हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांमध्ये लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास, तो हक्क, हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभांत सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन, आमचे अशिल सदरचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे, जाहीर नोटीस आहे.

दिनांक बुधवार, १२ जून २०२४

**ॲड. नवनित राहूल साळवी**
ऑफीस : बी/२०३, दुसरा मजला, 'निळकंठ व्हॅली'
फेज १, अलकनंदा, विहारी, खोपोली,
ता. खालापूर, जि. रायगड, ४१०२०३.
मो.७३८७२०२३२९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली जमीन खालील जमीन मालक यांचे मालकीची व प्रत्यक्ष ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली जमीन मिळकत आमचे खरेदीदारांनी विकत घेण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे:-

**मौजे नवघर, ता.सुधागड, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

**मिळकतीचे वर्णन**

| जमिन मालकाची नांवे | गट/ स.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|
| श्री. गोविंद मारूती चव्हाण<br>रा. नवघर, ता. सुधागड, जि. रायगड | ३१५ | १-१२-०० | ०-३३ |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही वहिवाट ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण बोझा, भाडेपट्टा, जप्ती, लिज, लीएन जाणे येणेचे मार्ग अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क, हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासह समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. त्याप्रमाणे मुदतीत हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून त्यासंबधी कोणाचेही कायदेशीर हक्क, हितसंबध नाही व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत, असे गृहीत धरून आवश्यक त्या कायदेशीर बाबींची पूर्तता करून आमचे खरेदी घेणार खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत बंधनकारक राहणार नाही. हे कळावे. येणे प्रमाणे जाहीर नोटीस असे.

दिनांक :- १३/०६/२०२४

सही/-
खरेदीदारांचे लेखक,
**श्री. सरदारमल जोरावरमल राठोड स्टॅम्प व्हेंडर,**
६९९ जमना निवास, पाली ता. सुधागड, जि. रायगड.
मो. ९४२११६८७६३/९२७०३६७२९०

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
(तहसिलदार कार्यालय, मुरुड जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड, जि. रायगड)
ज. म. र अर्ज २३/२०२४

## जाहीर नोटीस

ईस्माइल शरीफ हुक्केबरदार,
रा. मु. पो. राजपुरी, — अर्जदार
ता. मुरूड-जंजिरा, जि. रायगड.

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी, — सामनेवाला
ता. मुरुड, जि. रायगड.

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस काळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार यांचा सख्खा भाऊ मोहम्मद साजीद अलि हुक्केबरदार, यांचा जन्म दिनांक २६/०१/१९६८, रोजी राहत्या घरी म्हणजे मौजे राजपुरी, ता. मुरुड जंजिरा, जि. रायगड येथे झाला असून त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत राजपुरी कार्यालय यांचे जन्म मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरूड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदार यांचा सख्खा भाऊ मोहम्मद साजीद अलि हुक्केबरदार, यांचा दिनांक २६/०१/१९६८ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीलांमार्फत मे. न्यायालयांत दि.१६/०७/२०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीत असल्यास कोणचीही कोणतीही हरकत नाही. असे समजून अर्जदार यांनी जन्म मृत्यू नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता.११/०६/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली. कळावे.

सही/-
**(रोहन शिंदे)**
तहसिलदार मुरूड-जंजिरा

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. : - ८४/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. नासिर इस्माईल मुल्ला
वय ५४ वर्षे, धंदा : शेती. — अर्जदार
रा. मु. पो. मोर्बा,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
माणगांव नगरपंचायत माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्री. नासिर इस्माईल मुल्ला यांचा जन्म मौजे उपजिल्हा रुग्णालय माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २८/०९/१९७० रोजी राहत्या घरी झाला. त्यांची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दाखला क्र.मानपं/जन्म-मृत्यू/ २७०/२०२३-२४ ने दि. ३१/०५/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचा जन्म मौजे उपजिल्हा रुग्णालय माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २८/०९/१९७० रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. नासिर इस्माईल मुल्ला यांचा जन्म मौजे उपजिल्हा रुग्णालय माणगांव, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. २८/०९/१९७० रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. १२/०६/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल श्री. अखिलेश रामेश्वर भार्गव रा. ३०२ तारा महेल ५ वा रस्ता, खार मुंबई पश्चिम यांनी खाली वर्णन केलेल्या शेती मिळकतीचे नोटराईज कुळअखत्यारपत्र दिनांक १०/१०/२०१६ रोजी श्री सचिन बळीराम भोईर रा. तमनाथ ता. कर्जत, जि. रायगड यांना लिहून दिले होते. सदर शेतजमिन मिळकत मौजे तमनाथ ता. कर्जत जि. रायगड या ठिकाणी आहे. तीचे वर्णन खालीलप्रमाणेः

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| ४५ | २ अ २ | १-००-०० | १=०५ |

वरील मिळकतीचे नोटराईज कुळअखत्यारपत्र आजरोजी या जाहीर नोटीसीद्वारे व श्री. सचिन बळीराम भोईर रा. तमनाथ ता. कर्जत, जि. रायगड यांना रजिस्टर पोस्टाने नोटीस पाठवून आमचे अशिलांनी रद्द केलेले आहे. तरी यापुढे वरील मिळकती संदर्भात कोणीही प्रकरणात हजर राहणे, वकील पत्र देणे, कोणत्याही अन्य व्यक्तीसोबत कोणतेही काम ठरविणे, कुठल्याही प्रकारचा व्यवहार, अथवा करार आमचे अशिलाचे अखत्यारी म्हणून श्री. सचिन बळीराम भोईर रा. तमनाथ ता. कर्जत, जि. रायगड यांचे बरोबर करू नये. जर कोणीही यापुढे वरील मिळकती संदर्भात कुठल्याही प्रकारचा व्यवहार, दस्त अथवा करार श्री सचिन बळीराम भोईर रा. तमनाथ ता. कर्जत. जि. रायगड यांचे बरोबर केल्यास तो व्यवहार, दस्त अथवा करार आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही याची नोंद तमाम जनतेने घ्यावी.

ता. १२/०६/२०२४
मो. नं. ९९२१०२३८९४

ॲडव्होकेट
**ॲड. योगेश का. देशमुख**
पत्ता : श्री गणेश प्रसाद फ्लॅट नं १०४
कदम वाड्याजवळ, स्टेशन रोड कर्जत ता. कर्जत, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे चांधई, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर.पॉ. | आकार रुपये | आकार पैसे |
|---|---|---|---|---|---|
| श्री. किशोर काशिनाथ टेमघरे | ७५ | ९ | ०-१०-१० | १ | ०० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

सही/-
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक : १३/०६/२०२४
मो. नं. ८४४६८६९६७१

कार्यालयीन पत्ता:- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालीका शेजारी, ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

ई-मेल : nileshmundhe029@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाच्या मौजे कुणे, ता. अलिबाग, जि.रायगड येथील मिळकतीचे विद्यमान मालक श्री. जयश्री जगदिश नागे व विनायक उर्फ विनोद रामचंद्र नागे हे असून यांचेकडून विकत देण्याचे ठरविलेला असून सदर मिळकतीचा साठेकरार दि.०९/०५/२०२४ रोजी झालेला आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरोसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांना सदरच्या मिळकतीचा व्यवहार करण्याचा ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र.व उपविभाग | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| कुणे<br>ता. अलिबाग,<br>जि.रायगड | ३४६ | जिरायत ०-४७-८०<br>वरकस ०-०४-१०<br>पो.ख. ०-०५-५०<br>एकूण ०-५७-४० | १०.२८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीपैकी श्री. जयश्री जगदिश नागे व विनायक उर्फ विनोद रामचंद्र नागे यांच्या मालकी व ताबेकब्जा वहिवाटीची क्षेत्र ०-२०-०० आकार ३.९६ ही मिळकत सदरील नोटीसचा विषय आहे.

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र पुराव्यासहीत सादर करावी.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : १२/०६/२०२४

**ॲड. नभेश भा. ठाकूर**
बी.ए.एल.एल.बी
रायगड डिस्ट्रीक्ट कोर्ट अलिबाग-रायगड
७०६६७०९५९७
ऑफिस : मु. महाजने, पो. मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :- ९४/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. दगडू येटू पालकर
वय ६१ वर्षे, धंदा : शेती — अर्जदार
रा. मु. जावळी, पो. माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरुध्द

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत लोणशी, — सामनेवाला
ता. माणगांव, जि. रायगड.
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. दगडू येटू पालकर यांचे वडील कै. येटू उर्फ येटल्या धोंडू पालकर हे दि. २४/०३/१९८४ रोजी मौजे जावळी, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १०/०५/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे वडील कै. येटू उर्फ येटल्या धोंडू पालकर हे दि. २४/०३/१९८४ रोजी मयत झाले असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. दगडू येटू पालकर यांचे वडील कै. येटू उर्फ येटल्या धोंडू पालकर हे दि. २४/०३/१९८४ रोजी मौजे जावळी, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव :
ता. : २४/०५/२०२४

सही/-
कार्यकारी दंडाधिकारी माणगांव

**निवडक**

### कर्णधाराचा लाजिरवाणा विक्रम

**न्युयॉर्क :** टी-२० विश्वचषकात ऑस्ट्रेलियाने नामिबियावर ९ गडी राखून दणदणीत विजय मिळवला आहे. या सामन्यात नामिबियाचा कर्णधार गेरहार्ड इरास्मच्या नावे एक नकोसा विक्रम नोंदवला गेला. या खेळीदरम्यान इरास्मसने आपले खाते घडण्यासाठी तब्बल १७ चेंडू घेतले आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटच्या इतिहासात कोणत्याही फलंदाजाने आपल्या पहिल्या धावा करण्यासाठी १७ चेंडूंचा सामना करण्याची ही पहिलीच वेळ आहे.

### दिग्गजांनी रचला इतिहास

**न्युयॉर्क :** टी-२० विश्वचषक स्पर्धेत मोहम्मद नबी शानदार फॉर्मात असून याचा त्याला फायदा झाला. तो दोन स्थानांची झेप घेत पहिल्या क्रमांकावर पोहचला आहे. आतापर्यंत शाकिब अल हसन अष्टपैलूंच्या टी-२० क्रमवारीत अव्वल स्थानावर होता. मात्र, सध्या त्याची कामगिरी काही विशेष झाली नाही. यामुळे त्याची घसरण होऊन पाचव्या स्थानावर पोहोचला आहे. ऑस्ट्रेलियाचा मार्कस स्टॉयनिस तीन स्थानांची झेप घेऊन दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे.

### देशाच्या भावनांचा सत्यानाश

**लाहोर :** टी-२० विश्वचषकात पाकिस्तान क्रिकेट संघाची कामगिरी चर्चेचा विषय ठरला आहे. पाकिस्तानला अमेरिका आणि भारताविरुद्ध पराभवाचा सामना करावा लागला. यावर प्रतिक्रीया देत वसीम आक्रमने पाकिस्तान संघात सध्या फुट पडल्याचा इशारा दिला आहे. तो म्हणाला, कोणाचा मूड ऑफ आहे, तर त्याला याच्याची बोलायचं नाही. कमऑन, काय चाललंय हे. पूर्ण देशाच्या भावनांचा यांनी सत्यानाश केला आहे. कोणत्याही गोष्टीची मर्यादा असते.

### रिझवानची रोहितशी बरोबरी

**न्युयॉर्क :** टी-२० विश्वचषकात झालेल्या पाकिस्तान विरुद्ध कॅनडा सामन्यात पाकिस्तानच्या विजयात मोहम्मद रिझवानने मोठे योगदान दिले. या सामन्यात रिझवानने ५३ धावांची नाबाद खेळी केली. आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सलामीला फलंदाजी करताना ५० धावांचा टप्पा पार करण्याची ही ३०वी वेळ होती. त्यामुळे त्याने आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिकवेळा ५० धावा करणाऱ्या सलामीवीरांच्या यादीत रोहित शर्माच्या विश्वविक्रमाची बरोबरी केली आहे.

### रिषभ पंत दुसरा युवराज?

**नवी दिल्ली :** भारतीय संघाचा यष्टीरक्षक फलंदाज रिषभ पंत यंदाच्या टी-२० विश्वचषकात चांगले प्रदर्शन केले आहे. पंतची निर्भीड फलंदाजी पाहून चाहत्यांना आणि क्रिकेटपंडितांना वाटू लागले आहे की, पंत या विश्वचषकात सर्वाधिक धावा करणारा खेळाडू ठरेल. युवराज सिंगने २०११ च्या एकदिवसीय विश्वचषकात भारतासाठी जी भूमिका खेळली होती तीच भूमिका यंदाच्या विश्वचषकात पंत साकारणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# कांगारूने बदलले विजयाचे समीकरण




## सुपर-८ साठी पात्र ठरणारा दुसरा संघ

## नामिबियाला अवघ्या ७२ धावांत गुंडाळले

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकात ऑस्ट्रेलिया संघाने नामिबियाला हरवून सुपर-८ मध्ये प्रवेश केला आहे. नामिबिया ७२ धावांवर ऑल आऊट झाल्याने ऑस्ट्रेलियाने अवघ्या ५.४ षटकांत सामना जिंकला. ऑस्ट्रेलियाने हे लक्ष्य सहज गाठले. आता ऑस्ट्रेलिया सुपर-८ साठी पात्र ठरणारा दुसरा संघ बनला आहे. ऑस्ट्रेलियाच्या विजयानंतर आता नामिबियाही सुपर-८च्या शर्यतीतून बाहेर पडला आहे.

एकतर्फी झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नामिबियाचा ९ गडी राखून पराभव केला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाने नामिबियाला १७ षटकांत अवघ्या ७२ धावांत गुंडाळले होते. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने अवघ्या ५.४ षटकांत हे लक्ष्य गाठले. ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजांनी हा सामना एकतर्फी केला होता. कांगारू संघाकडून ॲडम झाम्पाने सर्वाधिक ४ बळी घेतले. याशिवाय हेझलवूड आणि स्टॉइनिसने २-२ विकेट घेतल्या आहेत.

दरम्यान, नाणेफेकीनंतर प्रथम फलंदाजीला आलेल्या नामिबियाला १४ धावांवर तिसऱ्या षटकाच्या चौथ्या चेंडूवर डेव्हिनचा (२) पहिला धक्का बसला. त्यानंतर चौथ्या षटकात फ्रायलिंकने (१) दुसरी विकेट टाकली. यानंतर संघाची तिसरी ५व्या षटकात मायकेल व्हॅन लिंगेनने १० चेंडूंत २ चौकारांच्या मदतीने १० धावा केल्या आणि विकेट टाकली. त्यानंतर संघाचा स्टार फलंदाज डेव्हिड व्हीजे (१) सहाव्या विकेटच्या रूपात ११व्या षटकात पॅव्हेलियनमध्ये परतला. पुढे जात रुबेन ट्रम्पलमनच्या १३व्या षटकात सातवी विकेट पडली. ट्रम्पलमॅनने ७ चेंडूत १ षटकाराच्या मदतीने ७ धावा केल्या होत्या. त्यानंतर नामिबियाला ८वा धक्का बर्नार्ड शॉल्ट्झच्या रूपाने बसला, त्याला झांपाने खाते न उघडता बोल्ड उडवत पॅव्हेलियनमध्ये परत पाठवले. यानंतर संघाने चांगली खेळी खेळणारा कर्णधार गेरहार्ड इरास्मसची (३६) नववी विकेट गमावली. आणि त्यानंतर नामिबियाने १७ व्या षटकात बेन शिकोंगोच्या रूपात १० वी विकेट गमावली.

ऑस्ट्रेलियाने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करताना डेव्हिड वॉर्नरने ८ चेंडूत २० धावा, ट्रॅव्हिस हेडने १७ चेंडूत नाबाद ३४ आणि मिचेल मार्शने ९ चेंडूत नाबाद १८ धावा केल्या.

ग्रुप स्टेजमध्ये एक सामना शिल्लक असताना ऑस्ट्रेलियाने सुपर-८साठी आधीच आपली जागा निश्चित केली आहे. कांगारू संघाला आता शेवटचा गट सामना १६ जून रोजी स्कॉटलंड संघाविरुद्ध खेळायचा आहे.

### चेंडू शिल्लक मोठा विजय

**नामिबियाने दिलेले ७२ धावांचे लक्ष्य ऑस्ट्रेलियाने पॉवरप्लेमध्येच पूर्ण केले. त्यांनी ८६ चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासातील हा दुसरा सर्वात मोठा विजय (चेंडू बाकी) होता. २०१४ मध्ये चितगाव येथे झालेल्या श्रीलंका आणि नेदरलँड्स यांच्यातील सामन्यात श्रीलंकेने ९० चेंडू शिल्लक असताना सामना जिंकला होता.**

## रोहित अन् हरमीत एकाच शाळेतले

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

टी विश्वचषकात अमेरिका संघात अनेक भारतीय वंशाचे खेळाडू आहेत. यातील अनेकांचा जन्मही भारतात झाला असून त्यांनी भारतात क्रिकेटचे धडे गिरवले आहेत. आता अमेरिकेकडून हे खेळाडू पहिल्यांदाच भारताविरुद्ध सामना खेळणार आहेत. यावेळी मुंबईत जन्मलेल्या पण आता अमेरिकेत स्थायिक झालेल्या सौरभ नेत्रावळकरने सूर्यकुमार यादव त्याचा चांगला मित्र असल्याचे सांगितले. त्याने त्याच्याबरोबर १५ वर्षांखालील, १७ वर्षांखालील क्रिकेट खेळले असल्याचेही सांगितले आहे. याबरोबरच आणखी एक मुंबईचा खेळाडू अमेरिका संघात आहे, हा खेळाडू म्हणजे हरमीत सिंग. तोही भारतासाठी १९ वर्षांखालील वर्ल्ड कप खेळला. त्याने सांगितले की, रोहित आणि तो एकाच शाळेत होते. तो म्हणाला, मोठा होत असताना मी रोहितकडे पाहायचो.

# पाकिस्तानचे स्पर्धेतील आव्हान कायम




**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत मंगळवारी पाकिस्तान विरुद्ध कॅनडा सामना पार पडला. या सामन्यात पाकिस्तानने सात गडी राखून विजय मिळवला. यासह गुणांचे खातेही उघडले. या विजयामुळे पाकिस्तानने स्पर्धेतील आव्हान कायम राखले आहे.

या सामन्यात कॅनडाने पाकिस्तानसमोर १०७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. या लक्ष्याचा पाठलाग पाकिस्तानने १७.३ षटकात ३ गडी गमावत पूर्ण केला. पाकिस्तानच्या विजयात मोहम्मद रिझवानने अर्धशतक करत मोलाचा वाटा उचलला. पाकिस्तानकडून रिझवानसह साइम आयुबने सलामीला फलंदाजी केली. पण पाचव्या षटकात आयुबला ६ धावांवर बाद केले. त्यानंतर रिझवानला कर्णधार बाबर आझमने भक्कम साथ दिली. या दोघांनी मिळून ६३ धावांची भागीदारी केली. त्यामुळे पाकिस्तानसाठी विजयाचा मार्ग सोपा झाला.

दरम्यान, पाकिस्तान विजयाच्या जवळ आलेला असताना बाबर ३३ धावांवर बाद झाला. त्याला डीलॉन हेलिगरने बाद केले. यानंतरही रिझवानने डाव पुढे नेत अर्धशतक केले, मात्र फखर जमानही ४ धावांवर १८ व्या षटकात बाद झाला. पण तेव्हा पाकिस्तानला विजयासाठी ३ धावांचीत गरज होती. या तीन धावा रिझवान आणि उस्मान खानने पूर्ण केल्या आणि या स्पर्धेतील पाकिस्तानच्या पहिल्या विजयावर शिक्कामोर्तब केले.

# पुणेरी बाप्पाचा दणदणीत विजय

**। पुणे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्यावतीने आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेत अकराव्या दिवशी कर्णधार ऋतुराज गायकवाड (८९) व अभिमन्यू जाधव (नाबाद ६५) यांनी केलेल्या झंझावती भागीदारीसह सचिन भोसले (४/१६) याने केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर ४ एस पुणेरी बाप्पा संघाने ईगल नाशिक टायटन्स संघावर डकवर्थ लुईस पद्धतीने ५९ धावांनी दणदणीत विजय मिळवला.



या स्पर्धेत नाशिक संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. वरच्या फळीतील पवन शहा (१२), यश क्षीरसागर (३), रोहन दामले (२०) हे झटपट बाद झाले. चौथ्या आणि पाचव्या क्रमांकावर फलंदाजीस उतरलेल्या अभिमन्यू जाधव व ऋतुराज गायकवाड या आक्रमक फलंदाजांनी चौथ्या विकेटसाठी ७६ चेंडूत १५१ धावांची भागीदारी केली. हि भागीदारी या मौसमातील विक्रमी भागीदारी ठरली. पुणे संघाने निर्धारित षटकात ४ बाद २१० धावांचे आव्हान उभे केले. हे आव्हान घेऊन उतरलेल्या नाशिक संघाला हे पेलवले नाही. नाशिक संघ १० षटकात ५ बाद ५१ अशा स्थितीत असताना पाऊस सुरु झाला. यावेळी नाशिक संघ डकवर्थ लुईस नियमानुसार ५९ धावांनी पिछाडीवर होता. पावसाच्या व्यत्ययामुळे ४ एस पुणेरी बाप्पा संघाने डकवर्थ लुईस पद्धतीने ५९ धावांनी विजय मिळवला.

# चॅम्पियन्सच्या स्वप्नांवर पाणी

**। फ्लोरिडा । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषकात चॅम्पियन्स श्रीलंकेच्या संघाला अवकाळी पावसाचा चांगलाच तडाखा बसला आहे. विश्वचषकाचा २३वा सामना नेपाळ आणि श्रीलंका यांच्यात खेळला जाणार होता. पण फ्लोरिडातील सेंट्रल ब्रॉवर्ड रिजनल पार्क स्टेडियम टर्फ मैदानावर दोघांमधील हा सामना पावसामुळे रद्द करण्यात आला आहे.




दक्षिण आफ्रिकेविरुद्धचा सामना गमावलेल्या श्रीलंकेच्या संघाला नेपाळविरुद्ध विजयाची नितांत गरज होती. पण पावसामुळे सामना रद्द झाल्यामुळे चॅम्पियन्स संघ टी-२० विश्वचषकामधून बाहेर गेला आहे. आता त्याचे सुपर-८चे भवितव्य जर-तर या समीकरणात अडकले आहे. हा सामना रद्द झाल्याने दोन्ही संघांना प्रत्येकी १ गुण देण्यात आला. या रद्द झालेल्या सामन्यानंतर दक्षिण आफ्रिका सुपर-८ मध्ये पोहोचणारा पहिला संघ ठरला आहे. श्रीलंकेला आता बांगलादेश आणि नेदरलँड्सविरुद्ध अधिक खेळायचे आहे. सुपर-८ गाठायचे असेल तर हे दोन्ही सामने जिंकावे लागतील. श्रीलंके यापैकी एकही सामना हरली तर ती बाहेर पडू शकते.

# भारताचे फिफा विश्वचषकाचे स्वप्न भंगले

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

फिफा विश्वचषक २०२६ मध्ये पोहोचण्याच्या भारताच्या आशा संपल्या आहेत. कतारकडून २-१ अशा पराभवानंतर भारतीय संघ विश्वचषक पात्रता फेरीतून बाहेर पडला आहे.

फिफा विश्वचषक २०२६ हा ११ जूनपासून अमेरिका, मेक्सिको आणि कॅनडा येथे होणार आहे. विश्वचषकासाठी पात्रता सामने खेळले जात आहेत. मंगळवारी भारत आणि कतार यांच्यात दोहा येथील जस्सिम बिन अहमद स्टेडियमवर सामना झाला. या सामन्यात भारत सुरुवातीपासूनच आघाडीवर होता. तथापि, खराब रेफरींगमुळे कतारला पहिली आघाडी मिळाली आणि संघाने सामना २-१ ने जिंकला. यासह भारताचे विश्वचषक पात्रता फेरीतील तिसऱ्या फेरीपर्यंत पोहोचण्याचे स्वप्न भंगले.



भारतीय संघाने पूर्वार्धात एक गोल नोंदवत कतारवर १-० अशी आघाडी घेतली. मात्र, सामन्याच्या उत्तरार्धात ७५व्या मिनिटाला कतारच्या युसूफ आयमानने हेडशॉट खेळला. भारताचा यष्टिरक्षक गुरप्रीतने हेडर अडवले आणि चेंडू गेम लाइनच्या पलीकडे गेला. मात्र, पंचांनी कोणतीही शिट्टी वाजवली नाही. यानंतर कतारच्या अल हसनने चेंडू आत घेतला आणि अयमानने गोल केला. यावर भारतीय खेळाडूंनी चेंडू गेम लाइनच्या बाहेर गेल्याने गोल करण्यास विरोध केला. रिप्ले पाहिल्यानंतर रेफ्रींनी कतारच्या बाजूने निकाल दिला आणि स्कोअर १-१ असा झाला. सामन्याच्या ८५व्या मिनिटाला अहमद अल-रावीने कतारसाठी दुसरा गोल करत संघाला २-१ असा विजय मिळवून दिला.

## सिराजच्या सात धावा कामी

**। न्युयॉर्क । वृत्तसंस्था ।**

टी-२० विश्वचषक स्पर्धेत भारतीय संघाने पाकिस्तानविरुद्ध ६ धावांनी विजय मिळवला. दरम्यान, पाकिस्तान विरुद्ध भारतीय संघासाठी प्रत्येक धाव महत्त्वाची ठरली, याचीच आठवण सामन्यानंतर मोहम्मद सिराजने करून दिली आहे. भारताकडून ११ व्या क्रमांकावर फलंदाजीला उतरलेल्या मोहम्मद सिराजने ७ चेंडूत नाबाद ७ धावा केल्या होत्या. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात भारतीय संघ १९ षटकात ११९ धावांवर सर्वबाद झाला होता. त्याच्या या ७ धावा संघासाठी महत्त्वाच्या ठरल्याबद्दल सिराजने आनंद व्यक्त केला आहे.

## सिद्धेश वीरची अष्टपैलू खेळी

# रायगडचा ‘रॉयल’ विजय

**। पुणे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या वतीने आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग स्पर्धेत अकराव्या दिवशी पहिल्या लढतीत सिद्धेश वीर (६१ व १/१९) याने केलेल्या अष्टपैलू खेळीच्या जोरावर रायगड रॉयल्स संघाने छत्रपती संभाजी किंग्स संघाचा ३ गडी राखून पराभव करत तिसरा विजय मिळवला.

रायगड रॉयल्स संघाने नाणेफेक जिंकून गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ओम भोसले व मुर्तझा ट्रंकवाला या सलामीच्या जोडीने ३२ चेंडूत ५३ धावांची भागीदारी करून संघाला चांगली सुरुवात करून दिली. ओमने ४८ चेंडूत नाबाद ८१ धावांची आक्रमक खेळी केली. त्यात त्याने ११ चौकार व १ षटकार मारले. त्याला मुर्तझाने ३९ चेंडूत ४ चौकार व ३ षटकाराच्या मदतीने ४४ धावांची खेळी करून साथ दिली.

मुर्तझाची झंझावती खेळी सिद्धेश वीरने झेल बाद करून संपुष्टात आणली. त्यानंतर, मात्र रायगडच्या गोलंदाजांनी भेदक गोलंदाजी करत छत्रपती संभाजी किंग्सच्या फलंदाजांना झटपट तंबूत पाठवले. ओमकार खाटपे (१), दिग्विजय पाटील (३), दिग्विजय जाधव (८), सौरभ सिंग (१), शाम काझी (२), स्वराज चव्हाण (२), आनंद ठेंगे (०) हे झटपट बाद झाले. रायगडकडून सुनील यादव (३-२४), सिद्धेश वीर (१-१९), विकी ओस्तवाल (१-१५) यांनी सुरेख गोलंदाजी करून छ. संभाजी किंग्स संघाला १४६ धावांवर रोखले.



१४६ धावांचा पाठलाग करताना रायगड संघाने १९.४ षटकात ७ बाद १४७ धावा करून पूर्ण केले. सलामीचा फलंदाज सिद्धेशने ५३ चेंडूत ३ चौकार, ३ षटकार मारत ६१ धावांची खेळी केली. प्रणय सिंगने स्पर्धेतील महागडा खेळाडू ठरलेल्या नौशाद शेखला ११ धावांवर बाद केले. त्यानंतर सिद्धेशने मेहुल पटेलच्या समवेत तिसऱ्या विकेटसाठी ४५ चेंडूत ५० धावांची भागीदारी करून संघाला विजयाच्या जवळ नेऊन ठेवले. मेहुलने ३५ चेंडूत ४२ धावा केल्या. यात त्याने ३ चौकार व १ षटकार मारला. त्यानंतर ऋषभ राठोडने २० धावा काढून संघाचा विजय सुकर केला.




# संघाला मोठ्या शस्त्रक्रियेची गरज

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**

भारताविरुद्ध पाकिस्तानच्या पराभवानंतर पाकिस्तानचे माजी दिग्गज खेळाडू बाबर आझम अँड कंपनीवर जोरदार टीका केली. त्यानंतर आता पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांनीही बाबर आझम संघाला अल्टीमेटम देत, आमच्या संघाला मोठ्या शस्त्रक्रियेची गरज असल्याचे म्हटले आहे.

टी-२० विश्वचषकात भारताविरुद्ध ६ धावांनी पराभव झाल्यानंतर बाबर आझम आणि कंपनीला सध्याच्या स्पर्धेतून बाहेर पडण्याचा धोका आहे. सुपर-८ मध्ये पोहोचण्यासाठी पाकिस्तानला साखळी टप्प्यातील उर्वरित सामन्यांमध्ये मोठा विजय मिळवावा लागेल. असे झाल्यास पाकिस्तान सुपर-८ मध्ये पोहोचण्याची शक्यता आहे. त्याचवेळी, भारताविरुद्ध पाकिस्तानच्या पराभवानंतर, माजी पाकिस्तानी दिग्गजाने बाबर आझम आणि कंपनीवर जोरदार टीका केली आहे. आता या यादीत पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे अध्यक्ष मोहसिन नक्वी यांचेही नाव जोडले गेले आहे. त्यांनी थेट बाबर आझम टीमला अल्टीमेटम दिला आहे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
**■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)